
# एक होता कारसेवक

अभिजित देशपांडे



MR
891.468
D 459 E

MR
891.468
D459E

INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA

# एक होता कारसेवक

इन्द्रराज
Entered

# एक होता कारसेवक

Ek Hota Karsevak

अभिजित देशपांडे

Abhijit Deshpande

लोकवाङ्मय गृह

Lokvangamaya Grah.

एक होता कारसेवक / अभिजित देशपांडे
Ek Hota Karsevak / Abhijit Deshpande

Library IIAS, Shimla
MR 891.468 D 459 E
00124287

म / ९२९
© अभिजित देशपांडे
पहिली आवृत्ती ⊙ : डिसेंबर २००५
दुसरी आवृत्ती ⊙ : जुलै २००६
Dec. 2005
July-2006
124287
31.3.08

मूल्य : ५० रुपये
ISBN 81-88284-66-1

Rs-50/-
MR
891.468
D459E

मुद्रक/प्रकाशक
प्रकाश विश्वासराव
लोकवाङ्मय गृह
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

मुद्रणस्थळ
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड
प्रभादेवी
मुंबई - ४०० ०२५

Prakash Vishwasrao
Mumbai

*When Hindutva activists tell us we are primarily Hindu, it is an invitation to forget our multicultural pursuit of dialoguing, politics and multicultural concern about tolerance and put ourselves in a little box in terms of our religion... And I think the cultivation of a singular identity makes a major contribution to the disaffection, violence and terrorism that exist in the world today.*

— Amartya Sen

*साधो, देखो जग बौराना।*
*साँची कहौ तो मारन धावे झूँठे जग पतियाना।*
*हिंदू कहत है राम हमारा मुसलमान रहमाना।*
*आपस मे दोऊ लड़े मरतु है मरम कोई नहिं जाना।*

— कबीर

# आभार

मेधाविनी नामजोशी, दीपक पवार, नितीन रिंढे, अविनाश साळापुरीकर, उदय रोटे, उदय तांबे — ज्यांच्या सोबतच्या चर्चांनी मला कायम एकांगी होण्यापासून वाचवलं आणि गुंत्याचं भान सतत जागतं ठेवलं.

— अभिजित देशपांडे

एक होता कारसेवक. ६ डिसेंबर १९९२च्या उन्मादी कारसेवेत अभिमानपूर्वक सहभागी होऊन मशीद पाडणारा. पण ज्या वेळी अयोध्येहून परतला... त्या वेळी देश पेटलेला होता. शहरा-शहरांवर, खेड्या-पाड्यांतून तणावाचे स्पष्ट सावट दिसत होते आणि जिथे हे सगळे विकोपाला गेले, तिथे तर दंगलीही उसळल्या. विशीच्या त्या कारसेवक तरुणाने देशाची फाळणी बघितली नव्हती, ऐकली होती फक्त. आणीबाणी काय असते, हेही समजण्याची शक्यता नव्हती. कारण जन्मच आणीबाणीच्या आसपासचा. छोट्याशा गोष्टीलाही मोठा मुद्दा बनविणारी प्रसारमाध्यमे त्या काळात नुकतीच भारतात प्रवेश करू पाहत होती. फक्त वर्तमानपत्रे होती. सरकारच्या नियंत्रणाखाली टीव्ही होता आणि उघड्या डोळ्यांनी दिसू शकणारा त्यांच्यापुरता एक चिमुकला समाज होता. पण त्याच्यासाठी हे सगळेच धक्कादायक होते, अस्वस्थ करणारे होते. मन सैरभैर झाले होते. बुद्धीही थाऱ्यावर नव्हती. प्रश्नांचे एक मोहोळ होते. त्याने मग स्वत:तल्या कट्टर हिंदुत्ववाद्याला प्रश्न विचारला, "हेच का ते हिंदू राष्ट्र?" ...आणि मग पुढे वयाच्या गद्धेपंचविशीत तो एका शहाण्या निर्णयापर्यंत आला— "...नाही, निदान मी तरी हे निश्चितपणे करणार नाही... यापुढे तरी मी यात सहभागी असणार नाही..."

एक होता कारसेवक... आणि... तो कारसेवक उरला नाही... गोष्ट एवढीच होती.

एका कारसेवकाच्या वैचारिक स्थित्यंतराची ही गोष्ट. अजूनही न संपलेली...

❑

गोष्ट सोपी नाही. ती वैचारिक स्थित्यंतराची आहे म्हणूनच बहुधा सोपी नाही. माझ्या बाबतीत असे काहीच घडले नाही की ज्याने मी हादरून जावे. ६ डिसेंबर १९९२नंतर कैक दंगली (आजतागायत) उसळल्या. पण त्याची आग माझ्या घरापर्यंत, माझ्यापर्यंत कधीच आली नाही. दंगलीची भीषणता काय असू शकते, हे मला टीव्हीतील दृश्यं आणि छापील माध्यमांतील फोटो वा लेखांपलीकडे कधीही साक्षात पाहण्याचा प्रसंग आला नाही. मला बदलवून टाकणाऱ्या बाह्य शक्ती माझ्या आजूबाजूला जवळजवळ अनुपस्थितच होत्या. धडका मला माझ्याच आतून बसत होत्या :

आपण ज्यासाठी अयोध्येला गेलो होतो ते हेच होते का? यातून आपल्याला किंवा कुणालाही काय मिळाले? हेच का ते रामराज्य? या उन्मादाने देशाचे भले होणार म्हणतात ते कसे? हा झुंडीचा 'राष्ट्रवाद' देशाला कुठे घेऊन जाणार...?

गोष्ट माझ्याच आतली होती. हिंदुत्ववादी विचारसरणीने माझा पुरता कब्जा घेतला होता, त्याची गोष्ट होती. माझ्या कुटुंबीयांची हिंदुत्ववादावर ठाम निष्ठा होती, त्याची गोष्ट होती. मंडल आयोगाच्या वैचारिक-व्यावहारिक ताणांतून विस्कटू लागलेला समाज अजून पुरता सावरलाही नव्हता आणि रामजन्मभूमी आंदोलनाने पेट घेतला, त्या अविचारी वातावरण आणि समाजाची ती गोष्ट होती. मी त्या उन्मादात ओढला गेलो आणि मग त्यातून बाहेर पडण्याची निकडही कालांतराने जाणवली, त्याची ही गोष्ट होती. मी स्वत:—कुटुंबीय—मित्र—नातलग—आपल्यापुरता आणि आपल्याला ज्ञात समाज आणि त्यात वर्चस्व गाजवणाऱ्या विचारसरणी—माझ्या भोवतालच्या धार्मिक वातावरणात दूरस्थ आणि क्षीण असलेल्या, बहुतांशपणे पुस्तकांतूनच विखुरलेल्या काही मानवीय—ऐहिक विचारधारा—या सगळ्यांचीच ती गोष्ट होती. ज्याचे धागे माझ्यात, माझ्या विश्वात होते. विचारांइतकेच भावनिक प्रश्नांशीही निगडित होते. घटनांपेक्षा भावना आणि विचारांची ती गोष्ट होती आणि म्हणूनच गोष्ट कठीण होती. ज्यात सगळे समकालीन वातावरणच एक पात्र होते.

❑

६ डिसेंबर १९९२. हा दिवस मला अजूनही स्पष्ट आठवतो. तो विसरणे शक्यच नाही. अयोध्येत लाखो कारसेवक जमले होते. त्यांत मीही एक होतो. कारसेवा करायची म्हणजे काय करायचे? माहिती नव्हते. कधी आवश्यकताच वाटली नाही, इतके वातावरण भारलेले होते. काहीतरी अपूर्व-ऐतिहासिक

करायचंय, याची खात्री पटली होती. सकाळी दहापासूनच रामनामसंकीर्तन आणि त्यापाठोपाठ ज्वलंत भाषणे ऐकली आणि दुपारी पावणेबाराच्या सुमारास एकच कल्लोळ झाला. कुणीतरी निर्देश केला की मशिदीवर कारसेवक चढलेयृत आणि भगवा झेंडा फड़कवतायृत. आणि मग सारा आसमंत घोषणांनी व्यापून गेला—'जय श्रीराम', 'एक धक्का और दो.. बाबरी मसजिद तोड दो..' आपण इतिहासकाळात आहोत आणि जणू किल्ल्यांवर चढाई करतोय, अशाच आवेशाने, आवेगाने कारसेवक मशिदीकडे सरकले, सरकत राहिले आणि काही स्पष्ट कळायच्या आत खरोखरीच बाबरी मशीद पाडायला सुरुवातही झाली. गर्दीतून वाट काढत कसाबसा मी मशिदीपर्यंत पोहोचलो. तेव्हा दुपारचे तीन वाजून गेले असतील. पाडणाऱ्यांमध्ये मीही सामील झालो. मशीद पाडली गेली. एक इतिहास धुळीला मिळाला.

दुसऱ्या दिवशी कधीतरी सैन्याच्या तुकड्या अयोध्येत दाखल झाल्या. कारसेवकांना अयोध्येच्या बाहेर काढायला सुरुवात झाली आणि मग मिळेल त्या गाडीने, अयोध्येहून सोडण्यात आलेल्या विशेष गाड्यांनी कारसेवकांचे जत्थेच्या जत्थे आपापल्या राज्यांत–जिल्ह्यांत परतायला प्रारंभ झाला.

ट्रेनमध्ये फारसे काही कळायला वाव नव्हता. पण देशभर दंगली उसळल्यायृत असे उडत उडत कानावर येत होते. कुठल्याही स्टेशनवर जा, पेपर संपलेले असायचे आणि प्लॅटफॉर्मवर जवळ जवळ शुकशुकाट. मी त्यावेळेस मराठवाड्यात परभणीला राहायचो. सुमारे तीन दिवसांच्या प्रवासानंतर आमचा कारसेवकांचा जत्था परभणीला पोहोचला आणि मग टीव्ही, वृत्तपत्रांतून दंगलीची भीषणता लक्षात आली. अनेक ठिकाणी कर्फ्यू होते. वातावरणात विलक्षण तणाव होता. तोवरच्या माझ्या वीस वर्षांच्या आयुष्यात परभणी कधी अशांत झाल्याचे माझ्या ऐकिवातही नव्हते. पण परभणीतही जाळपोळीच्या, मारहाणीच्या अनेक घटना कानावर आल्या आणि मग कारसेवेचा माझा सगळाच माज खाडकन उतरला, उतरत गेला. माझ्या कारसेवक असण्याच्या उन्मादाची माझी मलाच चीड आली. हिंदू असण्याचा गर्व वाटेनासा झाला. मी एक मोठा सामाजिक गुन्हा केलाय, या अपराधी जाणिवेने अस्वस्थ झालो आणि मग मी 'कारसेवक' अथवा 'हिंदू' राहिलो नाही. विचारांनी आणि विचारांती बदलत गेलो.

हे सगळेच खूप कठीण होते.

❑

आमच्या घरात आधीपासूनच संघाचे वातावरण होते. वडील संघ परिवारातले एक कार्यकर्ते आणि पदाधिकारी होते. आई, काका १९९०च्या कारसेवेत जाऊन लाठ्या खाऊन, अटकेत राहून आले होते. आजोबांमध्ये कट्टर असे काहीच नव्हते. कधीकाळी विश्व हिंदू परिषदेच्या गंगाकलशपूजन यात्रेत ते सहभागी झाले होते, पण तेवढ्यापुरतेच. माझी आजी एक विचारी बाई होती. खूप वाचायचीसुद्धा; पण घरात येणारा विशिष्ट पेपर, पुस्तकं आणि विशिष्ट विचारसरणीच्या माणसांशी येणारा सततचा संबंध यांमुळे तिचाही दृष्टिकोन एकांगी झाला होता. या सगळ्या वातावरणात मी स्वत:ही स्थानिक पातळीवर संघाचा सक्रिय कार्यकर्ता होतो आणि आपण जणू आता दुसरे स्वातंत्र्ययुद्धच लढतोय, अशी भावना माझ्यातही चेतवली गेली होती. त्यात काहीच चूक वाटत नव्हती. हिंदू राष्ट्र आता लवकरच प्रत्यक्षात येणार असा विश्वास, नव्हे खात्रीच होऊ लागली होती. पण बाबरी मशीद ज्या पाशवी उन्मादाने पाडली गेली (तो माझ्यातही होताच) आणि दंगली पेटल्या, त्यावरून मला हे 'हिंदू राष्ट्र' काय असणार याचे जणू लख्ख दर्शन झाले आणि दुसऱ्यांदा गुजरात दंगलीत त्याचा प्रत्यय आला. जिथे एकजात सगळ्या मुस्लिमांबद्दल द्वेषभावना असेल, असे हिंदू राष्ट्र मी पाहत होतो.

मला हे अपेक्षित नव्हते. मी संघाचे काम ताबडतोब पूर्ण बंद केले. पण कठीण मनस्थितीत अडकलो. मी माझ्या कॉलेजमध्येही मिसळलो नसेल, इतके त्या कॉलेजच्या दिवसांतही संघपरिवारात आणि प्रत्यक्ष कामात मिसळलो होतो. संघावर बंदी आल्यानंतर संघाचे जिल्हा प्रचारक आमच्या घरी भूमिगत म्हणून राहिले होते, इतकी अनेकांशी जवळीक होती. हीसुद्धा माणसेच आहेत. मला माणसे तोडायची नव्हती, पण विचारसरणीशी संपूर्ण संबंध तोडायचा होता; आणि हेच कठीण जात होते. या सगळ्या मानसिक त्रासांतून, या काळात मी स्वत:ला इतरांच्या दृष्टीने पूर्णपणे काही दिवस अज्ञातवासात ठेवलं. हेतू हा की या सगळ्याचा शांतपणे, समग्रपणे विचार करावा. नक्की कुठे, कुणाचे चुकतेय, ते जोखावे. सापडलीच तर आपल्यापुरती काही वैचारिक-व्यावहारिक उत्तरे शोधावीत. संघावरची बंदी उठल्यानंतर तर मला पुन्हा कामाचाही खूप आग्रह झाला. मी संघाचा पूर्णवेळ प्रचारक म्हणून काम करावे, असा प्रस्तावही ठेवला गेला. पण मी ते सगळेच नाकारले.

मी स्वत:ला विचारसरणीपासून पूर्णपणे तोडू पाहत होतो आणि माझ्या आसपासची, माझ्या घरातली माणसे मात्र त्यांच्या कट्टर हिंदुत्ववादी विचारसरणीला घट्ट चिकटून होती. त्यांना—त्या सगळ्यांनाच—एका

मर्यादेपलीकडे टाळणे शक्यच नव्हते आणि म्हणून कठीण जात होते. सुमारे दीड वर्षे मी अशा कठीण अवस्थेत काढली आणि मग पुढील शिक्षणासाठी मुंबईला आलो आणि तोही संबंध तुटला. तोडायचाच होता.

❑

मी मुंबईला आलो आणि तुलनेने मला इथे मोकळा अवकाश मिळाला. नवी माणसे, नवे जग. संघकार्यापासूनही दूर राहता आले, पण तरीही माझ्यातला अपराधीभाव मला स्वस्थ बसू देईना. असंख्य प्रश्न होते. प्रश्नांचा गुंताच होता तो. आणि माझी मलाच उत्तरे शोधायची होती. आपल्या देशातील हिंदू-मुस्लीम संघर्ष, धर्म आणि राजकारण यांतील संबंध, धर्म म्हणजे काय, धर्माची आवश्यकता... एक ना दोन... कैक. अभ्यासाऐवजी मग अशाच विषयांवरची पुस्तके झपाटून अधाशासारखा वाचायला लागलो. सगळीचकडे काही क्षीण धागे होते. सगळेच काही पटण्यासारखे नव्हते किंवा नाकारण्यासारखेही नव्हते. मला पडलेल्या प्रश्नांची नेमकी, रेडीमेड उत्तरे नव्हती. ती नसतातच. मग गोंधळात अधिकच भर पडत गेली. पण अशाच अवस्थेत चार्वाक, बुद्ध तत्त्वज्ञानांशी परिचय झाला, जे. कृष्णमूर्ती वाचण्यात आले; आणि अनपेक्षित ठिकाणी गुंता सुटल्यासारखा, निदान सुटू शकतो असे वाटू लागले.

—आणि या सगळ्या वाचनांतून, विचारांतून मी स्वत:पुरता काही मुद्यांशी येऊन पोहोचलो. चांगले, नैतिक जगण्यासाठी धर्माची, ईश्वराची आवश्यकता नसते, या निष्कर्षाप्रत मी आलो. मी विचारपूर्वक ईश्वर नाकारला. नाकारणारा मी पहिलाच नव्हतो, पण आता मी अल्पसंख्य झालो होतो. कारण माझ्या आसपास ईश्वराविषयी शंका उपस्थित करणारेसुद्धा कुणी नव्हते. एके दिवशी ही माझी मते मी घरी जाहीर केली आणि वादळ ओढवून घेतले. लहानपणी माझी मुंज झाली होती, गळ्यात जानवे होते, तेही एके दिवशी खुंटीला टांगून ठेवले. माझा युक्तिवाद साधा होता—जानवे हे जर संस्काराचे प्रतीक असेल तर संस्कारी माणसाने प्रतीक का म्हणून मिरवावे? संस्कार वर्तनातूनच प्रकट होतील. जर माझ्यात संस्कार नाहीत असे तुम्ही मानत असाल, तर ते प्रतीकांचे लोढणे निरर्थकच नाही का? संघवाल्यांच्या घरी असले प्रश्न उपस्थित करायचे नसतात, हा नियम मला तेव्हाच कळला. वडील कट्टर संघवाले असल्याने आमच्यात प्रचंड वाद झाले, सततच होत राहिले आणि मग लक्षात आले, या अशा वादांना अंतही नाही आणि अर्थही नाही.

ईश्वराबद्दल तर अनेक जणांशी बोलून पाहिले. प्रत्येकाचीच भूमिका एक तर संदिग्ध असायची; बावळट अंधश्रद्ध असायची; खुळचट तत्त्वज्ञानात्मक असायची अथवा बचावात्मक तरी असायची. म्हणजे 'ईश्वर' या कल्पनेतले फोलपण मला पुरते उमगले. ईश्वर असण्या-नसण्याची कुणाकडेच खात्रीलायक उत्तरे नाहीत. जी गोष्ट नाहीच ती सिद्ध तरी कशी करणार? आणि मग मी एकूणच धर्माबद्दल तपासणी सुरू केली. तेव्हा नैतिकतेच्या काही मानवीय गोष्टी सोडल्या तर धर्माचीही गरज मला वाटेनाशी झाली आणि अशा नैतिक गोष्टी तर सगळ्याच धर्मांत, कमी-अधिक फरकाने आहेत, हे मला जाणवू लागले. पण त्याहीपेक्षा उद्विग्न करणारी गोष्ट मला वाचनातून स्पष्ट होऊ लागली, ती म्हणजे धर्माच्या नावाने चालणारे शोषण. आणि त्याबाबत तर जणू सगळ्याच धर्मांमध्ये स्पर्धा चालते. तरीही लोक स्वत:ला धर्माच्या खुंटीला अडकवून घेतात, धर्मांध होतात, याचे मला कायमच आश्चर्य वाटत आले आहे. माझा साक्षात संबंध अर्थातच हिंदू धर्माशी होता. मला माझ्यापुरती त्याचीच चिकित्सा तातडीची वाटत होती.

❑

धर्म तुम्हाला निवडताच येत नाही, तो तुम्हाला जन्मत: चिकटून येतो. त्याला झुगारण्याचे अथवा बदलण्याचे स्वातंत्र्य मात्र तुम्ही घेऊ शकता. ते असलेच पाहिजे.

माझ्या घरातले वातावरण खूप धार्मिक असे कधीच नव्हते. माझे आजोबा सोवळे नेसून देवपूजेला बसायचे आणि मध्येच काही आठवल्यासारखे होऊन हातात झाडू घेऊन आसपासचा परिसर स्वच्छ करायचे. आजीच्या नैवेद्याला उशीर असला तर तसेच सोवळ्यानिशी चारचौघात जाऊन पेपर वाचत बसायचे आणि पुन्हा पूजेत परतायचे. ते काय मंत्र उच्चारत, ते कधीच कुणाला कळायचे नाही. पण त्यांची सगळी देवपूजाच अत्यंत यांत्रिक निरस असायची. आजी मात्र पूजा करी, तेव्हा व्यंकटेशस्तोत्र, मारुतीस्तोत्र, चार-सहा आरत्या असे बरेच करी; पण वेळ असेल तरच. नाहीतर ते सगळे आटोपते घेण्याची कलाही तिला अवगत होती. देव्हाऱ्यात बचकाभर फुले नि हळद-कुंकू वाहणे म्हणजे देवपूजा नाही, देव्हारा नि आसपासचा परिसर स्वच्छ दिसला पाहिजे, मन कसे प्रसन्न झाले पाहिजे, अशी तिची भूमिका होती. तिचा कामांचा उरकही चांगला होता नि स्वच्छता, टापटीप, नेमकेपणाही विलक्षणच होता. फक्त

देवपूजेबाबतच नाही तर घरकाम, बागकाम सगळेच ती तितकेच समरसून करायची. सोवळे म्हणजे स्वच्छता ही तिनेच मला सांगितलेली व्याख्या. तिच्या शेजारी बसून तिची स्वच्छ पूजा पाहणे आनंददायीच असायचे.

माझ्या आजोळी मात्र त्या मानाने थोडे कडकच वातावरण होते. सोवळे-ओवळे, देवपूजा, भोजनावळी असे बरेच काही. वेगवेगळे महाराजही तिथे काही दिवसांच्या मुक्कामी येत. उन्हाळ्याच्या सुट्टीत मी महिनाभर आजोळी जाऊन राहत असे, तेव्हा या सगळ्यांशी माझा संबंध येत असे. माझे आजोळ रिसोड (जि. वाशीम) माझ्या स्मरणात राहिले आहे ते एक मंदिरांचे गाव म्हणूनच. तिथे कुणा अमरदास बाबांचे एक भव्य संस्थान होते. संस्थानाच्या आवारात अमरदास बाबांसकट गणपती, मारुती, देवी... अशी नानाविध छोटी-मोठी मंदिरे होती. आत भिंतीवर देवी-देवतांची चित्रे होती. त्याच परिसरात एक सीताकुंड म्हणून ठिकाण दाखवले जायचे. सीतेने म्हणे वनवासात असताना तिथे स्नान केले होते. वाटेत एक मोडकळीस आलेले, पण मोठे गणपतीचे मंदिर होते. तिथेही पूजाअर्चा-अभिषेक-होमहवने चालायची. गावाच्या बाहेर दूरवर एका तळ्याकाठी देवीचे मंदिर होते. पिंगलाक्षी देवी तिचे नाव. तळ्याचा काठ, आसपास तीन-चार विस्तीर्ण वडाची झाडे, दूरवर पसरलेली हिरवीगार शेती आणि दुसऱ्या टोकाला दिसणारी एक नाथटेकडी—ते खूपच मोहक वाटायचे. या सगळ्याचा कळत नकळत परिणाम माझ्यावरही होत होताच.

मी चौथीत असतानापासूनच काहीबाही कविता रचायला लागलो होतो. घरात आजीच्या तोंडून व्यंकटेशस्तोत्राचे संस्कार झाले होते. त्या धर्तीवर मी, सातवीत असताना एकशे आठ ओव्यांचे एक गणपतीस्तोत्र रचले होते आणि घरातल्या लोकांनी, नातेवाईकांनी त्याचे पुढे चांगलेच कौतुक केले.

मी बारा वर्षांचा असेन तेव्हाची गोष्ट. उन्हाळ्याच्या सुट्टीत आजोळी गेलो होतो. तेव्हा तिथे राष्ट्रसंत पाचलेगावकर महाराज काही दिवस मुक्कामी आले होते. आजोळच्या त्या भल्या मोठ्या वाड्यात त्यांची प्रवचने चालत. बरीच गर्दी होई. एक विशिष्ट आध्यात्मिक परिभाषा कानावर पडत होती. एकदा दुपारी लहान मुलांमध्ये खेळता खेळता मी कीर्तन करण्याची नक्कल केली. कुणीतरी मोठ्या माणसाने ती नेमकी पाहिली आणि हा कीर्तन करतो असे जाहीर करून टाकले. गोष्ट पाचलेगावकर महाराजांपर्यंत गेली. ते मला

म्हणाले, "आज संध्याकाळी माझ्यासमोरच कर कीर्तन." आली का आता पंचाईत! खेळण्यातल्या नकलेचा गवगवा होऊन असे काहीतरी करावे लागेल, अशी सुतरामही कल्पना नव्हती. जेमतेम काही तास हाताशी होते. शाळेत वक्तृत्व स्पर्धा, कथाकथन स्पर्धांतून घेतलेला सहभाग आणि मिळवलेली काही बक्षिसे, काही पद्य लिहू शकण्याची कला, तोवर ऐकलेल्या कीर्तनांतून तयार झालेली कीर्तनाची संकल्पना, कानावर पडलेले अध्यात्म (ते कळलेले नव्हतेच, फक्त शब्द आत्मसात झाले होते)—या भांडवलावर, वयाच्या बाराव्या वर्षी, पाचलेगावकर महाराजांसमोर मी पहिले कीर्तन केले आणि त्यांनी दिलेल्या शाबासकीनंतर कीर्तनकारच ठरलो.

वडिलांनी माझे कीर्तन ऐकले नव्हते, पण मी असे काही करतो म्हटल्यावर त्यांनी मला एक रीतसर कीर्तनाचे पुस्तकच आणून दिले. त्यातले एक कीर्तन पाठ करून मी कीर्तनाची बाहेरची आमंत्रणे स्वीकारू लागलो. हे सगळे तीन-साडेतीन वर्षं छानच चालले. दरम्यान माझेही प्रयत्नपूर्वक कीर्तनकौशल्य सुधारले आणि लोक मला महाराजच म्हणायला लागले. पायांवर डोके ठेवू लागले. त्यावेळेस हे सगळेच वलय सुखावणारे होते.

❑

आता या सगळ्या घटनांकडे पाहताना लोकांच्या धर्मभोळेपणाचे हसू येते. धार्मिकतेपेक्षा धर्मभोळेपणा वाईटच. मी लिहिलेल्या गणपतीस्तोत्राचा तर एक किस्साच घडला. वडिलांनी त्याच्या अनेक प्रती तयार करून लोकांना वाटल्या. मी त्या स्तोत्रात शेवटी फलश्रुतीही लिहिली होती. हे स्तोत्र वाचले तर इडा-पिडा टळतात, विघ्ने येत नाहीत, एकशे आठ वेळा वाचन केले तर... मंगळवारी, चतुर्थीच्या दिवशी पारायणे केली तर अमुकअमुक घडते. असे बरेच काही मी त्यात लिहिले होते. आता अलीकडे पाच-सहा वर्षांपूर्वीची गोष्ट. आजोळी रिसोडला एक शिक्षक आहेत. माहूरकर त्यांचे नाव. मी रिसोडमध्ये आलो आहे हे कळल्यावर त्यांनी मला चतुर्थीचे निमित्त साधून जेवायला घरी बोलावले. आणखीही काहीजणांना बोलावले होते. तोवर मी या धार्मिकतेपासून पारच दूर गेलो होतो, तेव्हा त्या भोजनावळीत मला चांगलेच अवघडल्यासारखे वाटू लागले. ताटासमोर दक्षिणा ठेवून नमस्कार करून त्यांनी मला भरपूर आग्रह केला. पंगतीतल्या लोकांना माझा परिचय त्यांनी, मी कीर्तनकार आहे आणि लहान वयात एक गणपतीस्तोत्र लिहिलेय, असा करून

दिला. एवढ्या लहान वयात हे पूर्वजन्मीच्या पुण्याईशिवाय शक्यच नाही, हे त्यांच्या पुढील बोलण्याचे सार होते. मी मनोमन चांगलाच अवघडत चाललो. जेवणानंतर तर माझी विकेटच उडाली. जेवणे झाल्यावर माहूरकर माझ्याजवळ आले आणि म्हणाले, "तुम्हाला पण गणपतीचा साक्षात्कार झालाय का हो?" त्यांना न दुखावता काय उत्तर द्यायचे, ते मी मनोमन जुळवू लागलो. तसे तेच पुढे म्हणाले, "तुमचं गणपतीस्तोत्र आहे न् ते मी पाठच केलंय. मंगळवारी चतुर्थीला मी पारायणंही करतो. आणि एका चतुर्थीला मला तुम्ही वर्णन केल्यासारखी गणपतीची मूर्ती साक्षात दिसायला लागली. तसा तुम्हालाही अनुभव आला असेलच ना!" (आलाच असणार, असे त्यांनी गृहीत धरले होते.)

धार्मिकता आणि धर्मभोळेपणा यात एक अंतर आहे. धार्मिकता कुठे संपते आणि धर्मभोळेपणा कुठे सुरू होतो हे सांगता येणे कठीण आहे. पण माझ्या अनुभवांतून मला ते जाणवू मात्र लागले होते. धार्मिक माणूस आपला देव, धर्म, रीतिरिवाज, कर्मकांड याबाबत सश्रद्ध असतो. कुणाच्याही अध्यातमध्यात न पडता, कसलेही अवडंबर न माजवता तो आपल्या श्रद्धांचे पालन करीत असतो. तो इतरांच्या धार्मिकतेबाबत प्रश्न उपस्थित करीत नाही, त्यांचे स्वातंत्र्य त्याने मान्य केलेलेच असते आणि तितकाच आपल्या श्रद्धास्वातंत्र्याचा अवकाशही तो जपत असतो. एक माणूस म्हणून नीट वागावे हे मानवीय नैतिकतेचे परिमाण त्याच्या धर्मश्रद्धेला असते. त्यामुळे सात्त्विक वृत्ती त्याच्या धार्मिकतेत प्रत्येक गोष्टीत दिसून येते. देव साकार असो की निराकार, देवत्व म्हणजे सात्त्विकता हे त्याचे दृढ समीकरण असते. अशी श्रद्धा-भक्ती ही व्यक्तिगततेच्या पातळीवरच राहते. तिला सहसा संघटनेची, एकत्र येऊन मोठे काहीतरी करण्याची गरज भासत नाही. घराच्या बाहेर अशी भक्ती क्वचितच पडते. ही भक्ती देव आणि देवत्वावरची असते, तिला सहसा बुवा-महाराजांच्या खुंट्या लागत नाहीत. त्यापासूनही ती दूरच राहते. तो प्रांत हमखास धर्मभोळेपणाचा. बुवा-महाराजांच्या नादी लागणे, देवत्वापेक्षा तत्संबंधीच्या कर्मकांडांनाच अधिक महत्त्व, अंधश्रद्धा, (श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांतील सीमारेषा हाही एक स्वतंत्र वादविषय आहे) उपास-तापास, पूजाअर्चा, व्रत-वैकल्ये, अनेकदा तर नानाविध देवतांवर आणि महाराजांवर श्रद्धा, आपल्या कर्मापेक्षा ईश्वरी सत्ताच श्रेष्ठ मानून कौटुंबिक-व्यावहारिक दु:खाची सगळी उत्तरे धर्मक्षेत्रातच शोधणे आणि पर्यायाने अधिकाधिक धर्माच्या आहारी

जाणे याचे नाव धर्मभोळेपणा. बुवा-माता, बापू-महाराजांचे पंथ वाढतात ते अशाच माणसांच्या जीवावर. पर्यायाने धर्मभोळेपणाला संघटित रूप मिळते. त्याच्या खुणा (गंध, कुणाचा तरी फोटो असलेले लॉकेट, पेन बाळगणे, विशिष्ट पेहराव वा शब्द इत्यादी) मिरवण्यात या लोकांना धन्यता वाटते. आपण धर्मप्रवण असल्याचा अभिमान आणि इतरांनी तसे असावे, याबद्दलचा आग्रह त्यांच्या मनात, वृत्तीत मूळ धरतो.

परभणीला आमच्या शेजारी एक जोशी मावशी म्हणून राहत. त्यांचा नवरा एसूटीत कुठल्याशा साध्या पदावरच होता. त्यांची दोन मुले शाळकरी वयातली. असे चौकोनी कुटुंब. ते नव्यानेच शेजारी म्हणून आले. साधे पण टापटिपीचे घर. घरात विलक्षण धार्मिक वातावरण. एकदा जोशी मावशींचे आई-वडील दूरच्या तीर्थयात्रेला गेले होते. तिथे झालेल्या भीषण अपघातात आई गेल्या आणि वडील कसेबसे वाचले. या प्रसंगाने मावशी खूपच हळव्या झाल्या आणि अधिकच देवपूजा आणि तत्सम गोष्टींत वेळ घालवू लागल्या. आधीपासूनच होते की काय माहीत नाही, पण जोशी काका आठ-आठ, पंधरा-पंधरा दिवस बेपत्ता राहू लागले. ते कुठे जात, काय करत, कुणालाच माहीत नव्हते. बहुधा मावशींनाही नाही. सुरुवातीला हे इतरांना कळू नये याची त्यांनी खबरदारी घेतली, पण नंतर ते इतरांपर्यंत पोहोचले. काळजी, आर्थिक चिंता, प्रतिष्ठेच्या कल्पना या सर्वांमुळे मावशी खंगत चालल्या आणि त्यांनी उपास-तापास, व्रत-वैकल्ये यांचे प्रमाण इतके वाढवले की त्यांना नॉर्मल जीवन उरलेच नाही. घरातून त्या क्वचितच बाहेर पडत. गेल्या तर दूरच्या मंदिरात जात. नाहीतर घरातच देवासमोर जप करीत बसून राहत. घरावर कर्ज होते, ते वाढले. घराचा अर्धा हिस्सा विकूनही पुरेसा पैसा उभा राहू शकला नाही. एरवी अत्यंत सरळ-निर्व्यसनी असणारा, गणिताची भन्नाट जाण असणारा त्यांचा नवरा मात्र तसाच अधूनमधून बेपत्ता राहू लागला. मुलांचे शिक्षणाचे खर्चही वाढले. मावशींनी मध्यंतरी बालवाडी चालवली, पण अपुऱ्या जागेमुळे नि गैरसोयींमुळे तीही वर्षभरातच बंद करावी लागली. घरापासून सुमारे चार किमी दूरच्या मठात दररोज दुपारच्या आरतीला भर उन्हात अनवाणी जाणे, एखादा दिवस वगळता जवळजवळ दररोज उपास, कधीकधी तर पाण्याशिवाय राहणे, माणसांमध्ये न मिसळणे... असा नशिबाला दोष देत स्वत:चाच छळ आरंभला. काय झाले? देव धावून आलाच नाही. वर्षातले चार महिने बेपत्ता असणाऱ्या जोशींची नोकरी केवळ मानवीय जाणिवेपोटी कार्यालयाने टिकू दिली होती—त्यांचे सगळेच वागणे बेजबाबदारपणाचे

असूनदेखील. नोटीसा, मेमो देऊनही फरक पडेना तेव्हा नोकरीच गेली. साहेबाने शेवटी जोशी मावशींनाच विचारले, "तुम्ही ग्रॅज्युएट आहात, जोशींच्या जागी मी तुम्हाला नेमू शकतो, याल का?" त्याला नकार देऊन जोशी मावशींनी संधीचे शेवटचे कवाडही बंद केले. घर विकून, कर्ज थोडेफार कमी करून त्यांनी मग गावच सोडले. मोठा मुलगा तोवर पॉलिटेक्निकचा डिप्लोमा करून पुण्याला चारेक हजार रुपये मिळवू लागला होता, त्यानेही सहा महिन्याने 'स्वतंत्र व्यवसाय करायचाय' म्हणून नोकरीचा राजीनामा दिला. व्यवसाय जमला नाही, तेव्हा तोही कर्जबाजारी होऊन आईजवळ परतला. छोट्याने मात्र त्याही मन:स्थितीत आपले पॉलिटेक्निक पूर्ण केले. शिकण्याची इच्छा असूनही छोटीशी नोकरी धरली आणि आता तीन हजारांवर घरातल्या तीन मोठ्यांना तो सांभाळतोय. मावशी पार खंगल्यायत्. देव-कर्मकांड-जप-तप, व्रत-वैकल्ये यातून त्या अजून बाहेर पडलेल्या नाहीत. त्यांना तोच एक आधार वाटतो. त्यानेच आपले कधीतरी भले होणार आहे, असा त्यांचा आजही ठाम विश्वास आहे. धर्मभोळेपणाचे हे टोकाचे उदाहरण—अगदी माझ्या शेजारच्या घरात घडलेले.

धर्मभोळेपणातूनच माणूस धर्मांधही बनत जातो. आपलाच धर्म हा जगातला एकमेव, सर्वश्रेष्ठ धर्म आहे, इतर सर्व धर्म हे चुकीच्या मार्गाने जाणारे निरर्थक आहेत. तेव्हा आपल्या धर्माच्या प्रसारासाठी वाटेल ते केले पाहिजे, प्रसंगी संघटित होऊन धर्मयुद्धसुद्धा; आणि आपणच ते धर्मसैनिक आहोत ही प्रगाढ श्रद्धा म्हणजे धर्मांधता. धर्मभोळा माणूस एक वेळ स्वत:चा आणि कुटुंबाचा घात करून घेईल, पण धर्मांध माणूस उघडपणेच समाजविघातक असतो. इतरांच्या धर्मस्वातंत्र्याला नाकारणारी ही आक्रमक भूमिका असते. धर्मांधता एकेकटी असतच नाही, ती संघटित असते. मन:शांती हे त्याचे ध्येय नसतेच मुळी. धर्मक्रांती हा त्यांचा एकमेव ध्यास असतो. आणि त्याची सूत्रे मठ, पंथ यांच्या अधिपतींकडे असतात. म्हणजेच धर्मांध माणसे वास्तविकपणे कुणाकडून तरी वापरली जात असतात. विलक्षण प्रेरणेने भारलेले इतरांच्या हातचे बाहुले असतात आणि म्हणून हिंसक प्रवृत्ती हे धर्मांधतेचे एक उघडच लक्षण असते. विविध मठ, पंथ, बुवा-बापू-महाराजांचे अनुयायी हे त्याचे उदाहरण. अनेक मुस्लीम मुल्ला-मौलवीदेखील असे धर्मांधच निर्माण करीत असतात. त्यांना धर्मसंघर्षातच रस असतो आणि असे लोक कमी-जास्त संख्येने सगळ्याच धर्मांत आढळतात. धार्मिक कडवेपणा, कट्टरतावाद, मूलतत्त्ववाद अशी वेगवेगळी रूपे धर्मांधतेचीच.

धर्मांधांपेक्षाही अधिक भयानक, घातक जमात म्हणजे धर्माच्या नावावर राजकारण करणाऱ्यांची. त्यांचे दाखवायचे दात वेगळेच असतात. धर्म हे त्यांच्या दृष्टीने एक साधनमात्र असते. राज्यसत्ता हे त्यांचे खरे साध्य असते. हिंदुत्ववाद हे त्याचे भारतीय उदाहरण. हिंदुत्ववाद्यांचे विविध दावे पाहा : हिंदू हा एक धर्म नसून ती एक जीवनप्रणाली आहे, ती सर्वात प्राचीन आहे, आजतागायत टिकून आहे म्हणजेच ती सार्वकालिक आहे. ही संस्कृतीच आपल्या समाजाचा पाया/आधारभूत तत्त्व आहे. तेव्हा भारतीय संदर्भात पूर्वीपासूनच, 'राष्ट्र' ही संकल्पना राज्याधारित नसून सांस्कृतिक आहे. हिंदू हा बहुसंख्याकांचा धर्म असून तोच या राष्ट्राचा कणा आहे. अन्य धर्मांनी हिंदू संस्कृतीशी मिळून-मिसळूनच वागले पाहिजे. ज्यांची हिंदुत्वावर श्रद्धा नाही, ते देशाबद्दलही श्रद्धा बाळगत नाहीत. देशभक्तीची ती पूर्वअटच आहे. ही काही विधाने म्हणजे थोडक्यात हिंदुत्ववादाचे सार आहे.

वरील भूमिकेत सांकल्पनिक घोटाळे खूपच आहेत. अनैतिहासिकता आहे. अशास्त्रीयता आहे. परस्पर विसंगती आहे. वास्तविक धर्म आणि राजकारण हा पूर्णत: स्वतंत्र चर्चेचा विषय आहे. हिंदू हा एक धर्म आहे, तर हिंदुत्ववाद ही एक राजकीय विचारसरणी आहे. हिंदू धर्मियांना संघटित करण्यासाठी निर्माण झालेल्या या संकल्पनेने पुढे कालांतराने राजकीय विचारसरणीचे स्वरूप धारण केले. (अर्थात या संकल्पनेच्या बीजरूपापासूनच तिला राजकीय संदर्भ होते.) परंतु मागील पंधरा-सतरा वर्षांमध्ये हिंदुत्ववादाने भारतीय राजकीय परिघ व्यापला आहे. धर्मनिरपेक्षतेसमोर वैचारिक आणि व्यावहारिक आव्हान उभे केले आहे. धर्माच्या तात्त्विक-नैतिक अंगांशी, रूढी वा पद्धतींशी या विचारसरणीचा काही एक संबंध नसतो. परंतु त्याचा चतुराईने हवा तसा वापर करून त्याचे राजकीय भांडवल करणे, त्यातून आपले राजकीय सामर्थ्य वाढवणे हा छुपा डाव त्यामागे असतो. त्यामुळे एकीकडे धार्मिक कट्टरता पोसणे तर दुसरीकडे राजकीय सोयीनुसार आपली भाषा आणि व्यवहारांची तीव्रता कमी-जास्त ठेवणे—असा चतुर डाव त्यामागे असतो. त्यामुळे धार्मिक, धर्मभोळे, धर्मांध आदी सर्व प्रकारांतले लोक कमी-जास्त फरकाने त्यांच्या प्रभावपरिघात येतात. 'बहुसंख्याकवादाचे राजकारण' हे या विचारसरणीचे मध्यवर्ती सूत्र असते. हे लोक सामाजिक दृष्ट्या सर्वाधिक घातक. तणावजन्य परिस्थिती, दंगली, धर्माचे राजकारण याला धगधगते ठेवण्यात मागील काही वर्षांत हिंदुत्ववादच कारणीभूत ठरला आहे.

देव, धर्म, रूढी यांना सपशेल नकार देणारे काही लोक असतात. त्यांना साधारणपणे 'नास्तिक' असे म्हटले जाते आणि नास्तिक या संकल्पनेत एक उघडच नकारात्मकता अध्याहृत आहे. तथापि निरीश्वरवाद, बुद्धिवाद, विज्ञाननिष्ठता ही त्यांची सर्वसाधारण वैशिष्ट्ये असतात. त्यांनी आपल्या स्वत:पुरता देव, धर्म, रूढींना नकार दिलेला असला, तरी त्यावरील लोकश्रद्धा हे एक सामाजिक वास्तव आहे याकडे त्यांचे दुर्लक्ष झालेले असते. परिणामी नास्तिकतेचा शिक्का मारून (कारण बहुतांश समाजाच्या दृष्टीने नास्तिकता ही एक शिवीच असते) समाज या लोकांना, आणि महत्त्वाचे म्हणजे त्यांनी उपस्थित केलेल्या वैचारिक मुद्यांना तीव्रपणे नकार देतो. परिणामी या विचारांमागील 'सामाजिक कळकळ' समाजापर्यंत कधी पोहोचतच नाही. यात वैचारिकतेचा पराभव होतो आणि धर्मांधांना बळ मिळत राहते.

परंतु असेही काही लोक असतात की ज्यांनी लोकश्रद्धेचे सामाजिक वास्तव स्वीकारलेले असते. व्यक्तिगत पातळीवर त्यांनी देव, धर्म, रूढी आदींना अमान्य केले असले तरी त्यावरच्या श्रद्धेने समाजाला मिळत असलेल्या सांकल्पनिक बळाचे, प्रेरणेचे त्यांना पुरेसे भान असते. देव, धर्म, रूढींना नकार म्हणजे लोकांच्या जीवनश्रद्धेला नकार. तेव्हा त्यांचा उचित आदर करीत, पण त्याला सुयोग्य वळण लावण्याचे काम ते करीत असतात. यांना धर्मसुधारक असे म्हणता येईल. ईश्वरावर श्रद्धा ठेवणारी आपली भक्तिपरंपरा, व्यक्तिश: काही धर्ममुद्यांना नाकारून त्याला समकालीन संदर्भात प्रस्तुत बनवू पाहणारे एकोणिसाव्या-विसाव्या शतकातले विचारवंत—हे सगळेच तपशिलाने निराळे असले तरी त्यांच्यातील धर्मसुधारणेचे सूत्र मात्र समान आहे. आपली महात्मा गांधीपर्यंतची सगळी संतपरंपरा धार्मिक आणि तरीही धर्मनिरपेक्ष होती, याचे भानच आज आपल्याला नाही. धार्मिकता विरुद्ध धर्मनिरपेक्षता असे एक खोटेच भांडण अलीकडच्या काळात हिंदुत्ववाद्यांनी उभे केले आहे. जे जे धर्मनिरपेक्ष ते ते धर्माच्या विरुद्ध असा अपप्रचार जाणीवपूर्वक आणि सातत्याने पेरला जात आहे. त्यातूनच 'Psudo Secularism' अथवा 'ढोंगी/व्याज धर्मनिरपेक्षता' असा शब्दही अडवाणींनी चलनात आणला आणि रूढही केला आहे. वास्तविक या दोन गोष्टी परस्परविरोधी नव्हेत. गांधीजी वृत्तीने अत्यंत धार्मिक होते आणि तरीही ते धर्मनिरपेक्ष राहू शकत होते. आणि यांत कुठलेही द्वंद्व नाही. हे अगदी अलीकडचे ठळक उदाहरण. सगळी भारतीय भक्तिपरंपरा मला व्यक्तिश: 'धर्मनिरपेक्ष'च वाटते. जरी हा शब्द खूप नंतर आला असला, तरी त्यातून ध्वनित होणारी उदार, सर्वाश्रयी, समन्वयवादी

वृत्ती इथल्या भूमीत आधीपासूनच होती. पण त्याच वृत्तीमुळे आपला सतत पराभव झाला, आपण दुबळे बनलो, असे एकदा विश्लेषण स्वीकारले (सावरकरांच्या हिंदुत्ववादी इतिहासदृष्टीचे ते सारच आहे) की मग आपोआपच धर्मनिरपेक्षता त्याज्य ठरते आणि वरीलप्रमाणे खोटा संघर्ष उभा करता येतो. धर्मनिरपेक्षता ही पाश्चात्त्य संकल्पना आहे. तेव्हा आपल्या भारतीय संदर्भात ती गैरलागू आहे, असाही एक दावा हिंदुत्ववादी करतात. चर्च आणि राज्य या दोहोंच्या संघर्षातून धर्मनिरपेक्षता ही संकल्पना युरोपात प्रथम मांडली गेली हे खरे आहे. राज्याने चर्चच्या कारभारात ढवळाढवळ करू नये, हा त्याचा तिथला अर्थ; परंतु भारतीय घटनाकारांनी ही संकल्पना नव्या आशयासह इथे स्वीकारली. स्वेतर पंथ-धर्मीयांचा आदर करणे ही लोकशाहीशी सुसंगत व्यापक मानवतावादी धारणा म्हणून त्यांनी धर्मनिरपेक्षता स्वीकारली. खरे तर आपल्याच परंपरेतील या वृत्तीला एक पाश्चात्त्य शब्द फक्त दिला.

भारतीय राज्यघटनेनुसार भारत हे ‘धर्मनिरपेक्ष गणतंत्र’ आहे. पण ‘धर्मनिरपेक्ष’ या संकल्पनेचे पुरेसे स्पष्ट विस्तृत विश्लेषण नसणे ही सर्वात मोठी अडचण आहे आणि नेमका याच शब्दाचा हवा तेव्हा हवा तसा वापर-गैरवापर करत विविध पक्ष-सरकारांनी या संकल्पनेचा पुरता बोजवारा उडविला आहे. त्यामुळे समान नागरी कायदा, शाहबानो खटला या आणि अशा अनेक छोट्या मोठ्या प्रश्न व प्रसंगांत धर्मनिरपेक्षतावाद्यांची भूमिका कायमच संदिग्ध राहिली आहे. त्यातूनच अडवाणींसारख्यांना 'Psudo Secularism' हा शब्द रुजवता आला आणि त्याही पुढे जाऊन ‘आम्हीच खरे धर्मनिरपेक्षतावादी’ असा आवही आणता आला. काही काळ का असेना हे ढोंग लोकांना खरेच पटू शकले. तेव्हा वरकरणी शाब्दिक वाटणारा हा मुद्दा किती गंभीर आहे, हे लक्षात येते. धर्मनिरपेक्षतेची संकल्पना पुरेशा स्पष्टतेने आपण भारतीय जनमानसापर्यंत नेऊ शकलो नाही, त्यामुळे ज्या ज्या वेळी धर्मनिरपेक्षतेवर हल्ले होतात, आक्षेप घेतले जातात तेव्हा तेव्हा धर्मनिरपेक्षतावाद्यांना निव्वळ प्रतिक्रियेच्या पातळीवरच उत्तर देता येते, आक्षेपांचा प्रतिवाद करावा लागतो व कायम एका नकारात्मक व बचावात्मक भूमिकेतच वावरावे लागते. धर्मनिरपेक्षतेला एक विधायक, संस्थात्मक, सक्रीय रूप देण्यात आपण सर्वचजण कुठेतरी कमी पडलो आहोत. त्याचाच हिंदुत्ववाद्यांनी पुरेपूर फायदा घेतला आहे.

धर्म या संकल्पनेच्या संदर्भात समाजात असणाऱ्या विविध भूमिकांची पुढीलप्रकारे वर्गवारी करता येते :

- धार्मिक — धर्मभोळे — धर्मांध — आस्तिक.
- धर्मसुधारक — नास्तिक — धर्मनिरपेक्ष — निधर्मी.
- धर्माला राजकीय रंग देणारे, उदा. हिंदुत्ववादी.

धर्माच्या अनुषंगाने समाजात निर्माण होणाऱ्या प्रश्नांची चिकित्सा करताना वरील वर्गवारी काही प्रमाणात उपयुक्त ठरते, पण धर्माचा हा प्रश्न केवळ एकक्षेत्रीय नाही. तो सामाजिक, सांस्कृतिक आहे आणि म्हणून तो अनेक क्षेत्रांमध्ये पसरलेला आहे. कदाचित एक व्यक्ती म्हणून त्याविषयीची माझी माहिती, आकलन, अन्वय सगळेच मर्यादित असू शकेल, पण प्रश्न आहेत हे मला स्पष्टपणे जाणवते. आणि माझ्या विचार-भावप्रक्रियांनी, व्यक्तिगत अनुभवांनी मी माझे अन्वय लावतोच.

❑

एकात दुसरा — दुसऱ्यात तिसरा — पाचवा — सतरावा — बेचाळीसावा... असे असंख्य प्रश्न एकमेकांत गुंतलेले असतात. आपल्या आकलनाबाहेरचेच खूप असते. कधी जाणतेपणी तर कधी नेणतेपणी आपण ते सगळे आपल्या आत शोषून घेत असतो. त्यातून आत काहीतरी खळबळ सुरू होते. आतल्या खळबळीने बाहेरच्या जगाची परिमाणे बदलतात. आतले-बाहेरचे असे संघर्ष उभे राहतात. बाहेरच्याही अनेक गोष्टी आपल्यावर आदळत असतातच. आतली खळबळ मग अधिकच वाढते. तुम्ही संवेदनशील असाल तर त्रासच होतो.

हे सगळं काय आहे?
कोण घडवतंय?
त्यावर नियंत्रण नक्की कुणाचं?
या सगळ्यात तुझं स्थान काय?

आपण मग आपल्यापुरता त्याचा अन्वय लावतो. तो एकच एक मात्र असत नाही. कुठलाच नसतो. कुणाचाच. पण आपल्या विचार-भाव-संवेदनांच्या संदर्भात आपले एक अनुभवविश्व घडलेले असते, घडत असते. तुमचा जगाचा अन्वय हा त्या अनुभवविश्वातून उमटतो. तो अन्वय हा तुमचा आवाज. तो सांगितला पाहिंजे. व्यक्त केला पाहिजे. न जाणो कुणाशी संवाद साधला जाईलही त्यातून. त्यासाठी हे लिहिणे. त्या अन्वयाने आपणच घडू. आपल्याच जबाबदारीवर.

❑

धर्माची संकल्पना स्थिर नाही. प्रत्येक समाजागणिक आणि काळागणिक तिचा आशय बदलत आला आहे.

अ. देवताविषयक संकल्पना आणि उपासनापद्धती.

ब. नीतिमूल्ये. उदा. सत्य, अहिंसा, प्रामाणिकपणा, त्याग, प्रेम, इ.

क. ऐहिक जीवनाबद्दलच्या धारणा, रीतिरिवाज.

ही धर्माची तीन मूलभूत अंगे आहेत. तथापि बदलत जातो तो त्यांतील आशय, तपशील. उदाहणार्थ, वैदिक देवता इंद्र, वरुण, ब्रह्म यांना हिंदूंच्या धर्म उपासनेत आजघडीला स्थान राहिलेले नाही. तर सत्यनारायण, संतोषीमाता यांसारख्या वेद-उपनिषदे-पुराणे यात साधा नामोल्लेखही नसलेल्या देवता आज प्रतिष्ठित होऊन बसल्या आहेत. ऐहिक धारणा आणि रीतिरिवाज ही देखील काळानुसार बदलत जाणारी गोष्ट आहे. उदाहरणार्थ, ब्राह्मणाने शेंडी ठेवावी, सकाळ-संध्याकाळ नियमित संध्या करावी... इत्यादी अनेक रीती स्वत:ला अभिमानाने ब्राह्मण म्हणविणाऱ्या लोकांतूनही अस्तंगत झाल्या आहेत. नीतिमूल्ये ही समाजाला आदर्श जीवनाचे धडे देत असतात. सामाजिक दृष्ट्या धर्माचे हे अंग विशेष महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील वारकरी परंपरेने किंवा एकुणातच भक्तिपरंपरेने, महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाने, गाडगेबाबांच्या एकाकी तत्त्वज्ञानाने ते थेट आंबेडकरांच्या बौद्ध धम्म प्रवेशाने धर्माचे हे नैतिकतेचे अंगच महत्त्वाचे मानले. महाराष्ट्रातील धर्मसुधारकांना पार्श्वभूमी आहे ती या नैतिकतेच्या प्रतिष्ठापनेची. जातिव्यवस्था-अस्पृश्यता आणि नैतिकता या एकत्र नांदणाऱ्या गोष्टी नव्हेत.

माझी आजी आर्यसमाजी होती. त्याचा तिला अभिमानही होता. कोणत्याही आजीसारखीच ती श्रद्धाळूही होती, पण अपवादात्मक लवचिकही होती. तिच्या काळातल्या राष्ट्रीय वातावरणाने ती भारलेली होती. झाशीची राणी, शिवाजी महाराज हे तिचे आवडते चर्चाविषय. ती मला तिच्यासोबत कीर्तनाला घेऊन जायची, तेव्हा आवर्जून सांगायची, अमूक अमूक बुवांचे कीर्तन जास्त छान असते कारण त्यातून ते समाजाला काही उपदेश करतात. आर्थिक स्थितीमुळे तिला फारसे कुठे भटकायला मिळाले नाही, पण माझ्याजवळ ती कितीतरी वेळा म्हणालीय, "मला तीर्थयात्रेपेक्षा शिवाजीचे किल्ले पाहायचे आहेत." ते तिला अखेरपर्यंत शक्य झाले नाही.

मला आठवते, मी असाच एकदा कॉलेजमधून आलो. 'समाजशास्त्र',

'प्राचीन मराठी साहित्याचा इतिहास' या विषयांनी थोडा (अधिकच) भारावलेला होतो आणि हिंदू धर्म जातीवर आधारित असून ते कसे चूक आहे, अस्पृश्यता वाईट कशी आहे याबद्दल बोलायला लागलो. तात्पर्य हे की आपण (म्हणजे ब्राह्मणांनी) बदलायला पाहिजे. आजीने हे सगळे ऐकून घेतले. एका शब्दानेही काही बोलली नाही आणि दुसऱ्याच दिवशी तिने आमचे एक शेजारी मेटकर (हे जातीने महार होते) यांना चहाला बोलावले. मेटकर काका-काकू आणि त्यांची पोरे—सगळ्यांनाच. काकूंना स्वैपाकघरात पाट मांडला. पोरे स्वैपाकघरात हुंदडली. कुणाही पाहुण्याइतकेच अगत्य तिने त्यांचे केले. वाटले, आजीने एक वेळ माझ्या थोबाडीत मारले असते तरी चालले असते, पण जिला डिवचण्यासाठी काल मी भाषणबाजी केली होती, तिने त्याला किती शांतपणे उत्तर द्यावे? मी एका अर्थाने तिच्यावर जात्यंधतेचा आरोपच करत होतो. तिने आजच काय, कधीच तिच्या वर्तनातून जातीचा अभिमान वागवला नव्हता. इतर आज्या करतात तसे सोवळे-ओवळे केले नव्हते. आम्ही पूर्वी राहायचो तिथे तर शेजारी काही टपरीवजा हॉटेल्स होती. तिथला नजीर खीरकुर्मा आणून द्यायचा नि आजीनेही सणाला त्याला बोलावून पुरणपोळ्या खाऊ घातल्या आहेत. एखाद् दुसरा वगळता ब्राह्मणांचा शेजार नव्हताच आणि आजीही कधी ब्राह्मण होऊन राहिली नाही. ती हे कुठून शिकली होती? ज्या गोष्टींशी माझ्या आईलाही जुळवून घेता आले नाही, त्या गोष्टी ती विनातक्रार आनंदाने करीत होती. धर्म कुठे संपतो आणि मानवी नाते कुठे सुरू होते, हे फक्त तिलाच कळले होते. माझ्यासारखी पुस्तकी ती खासच नव्हती. माझे सगळे बालपण तिच्या सावलीत गेले, पण तिचे वेगळेपण-मोठेपण मला खूप उशिरा कळले.

वडील संघाचे कट्टर कार्यकर्ते. त्यांच्या लेखी धर्माची व्याख्या आणखीनच निराळी. 'धर्मो धारयते प्रजा': ही संघवाल्यांची एक आवडती धर्मव्याख्या आहे. प्रजेच्या (समाजाच्या) धारणा म्हणजे धर्म, हा त्याचा आशय. धर्माची इतकी संदिग्ध, भोंगळ व्याख्या आजवर माझ्या पाहण्यात नाही. दुसरी व्याख्या 'हिंदू' या शब्दाची.

> असिंधुसिंधुपर्यंता यस्य भारतभूमिका।
> पितृभूः पुण्यभूश्चैव स वै 'हिंदू' रिति स्मृतः।।

सावरकरांनी रूढ केलेली ही व्याख्यादेखील याच जातीची आहे. भारतभूमीला पितृभूमी आणि पुण्यभूमी मानणारा प्रत्येक जण म्हणजे हिंदू! या दोनही व्याख्या

(किंवा संकल्पना) उघडपणेच अशास्त्रीय आहेत. निव्वळ भावनिक स्वरूपाच्या आहेत. भावनिकता हा निश्चितपणे धर्माचा एक आधार आहे, पण तो एकमेव नाही आणि याच व्याख्येतून धर्म-राष्ट्र आणि राज्य या तीन संकल्पनांची सांगड हिंदुत्ववाद्यांनी घातली आहे.

एकीकडे भारताला पितृभूमी-पुण्यभूमी मानणारा प्रत्येकजण म्हणजे हिंदू असे म्हणायचे आणि दुसरीकडे व्यवहारात मात्र निव्वळ उपासना-पद्धती व रीतिरिवाजांवरून हिंदू-मुस्लिम-ख्रिश्चन असे उल्लेख करायचे, यात उघडपणेच एक ढोंगीपणा व दुटप्पीपणा आहे. शिख, जैन आणि बौद्ध हे हिंदू धर्मांतर्गत असणारेच उपप्रवाह आहेत, असा अनैतिहासिक सिद्धांतही संघवाल्यांचा लाडका आहे. यातून संघवाले शिताफीने चार गोष्टी साधू पाहतात. एक म्हणजे, इतिहासातील संघर्ष दडवणे. दुसरे म्हणजे, 'तुम्ही आमचेच आहात' असे म्हणून व्यापकतेचा आव आणणे. तिसरे : हे पंथ याच भूमीत जन्मलेले असल्याचे सांगून आपल्या राष्ट्रवादी संकल्पनेला बळकटी देणे आणि चौथे : या प्रकारात आपोआपच मुस्लीम आणि ख्रिश्चनांना दूर ठेवणे, त्यांना वगळणे. या सर्व गोष्टींतून हिंदुत्ववाद्यांनी (जाणीवपूर्वक) गोंधळ वाढवला आहे. तो त्यांच्या व्यापक धोरणाचाच भाग आहे. याप्रकारे हिंदुत्ववाद्यांची धर्माची संकल्पना कुठल्याही शास्त्रीय पायावर टिकू शकत नाही.

❑

माझा हिंदुत्ववादाशी संबंध आला तो संघाच्या माध्यमातून. माझे वडील हे संघाचे कट्टर स्वयंसेवक. वेगवेगळ्या स्तरावरच्या जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या होत्या. मराठवाड्यात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद रुजविण्याचे आणि ती विस्तारण्याचे काम करणाऱ्या प्रमुख कार्यकर्त्यांपैकी ते एक होते. आणीबाणीच्या काळात अनेक गुप्त बैठका घरी होत असत. संघ कार्यकर्ते आणि पदाधिकारी घरी येत. मी जेमतेम सव्वा वर्षाचा असेन. माझ्या पाठच्या बहिणीचे बारसे होते. आमच्या घरी आणीबाणीच्या विरोधात बैठका चालतात याचा पोलिसांना सुगावा लागला आणि नेमक्या बारशाच्या दिवशी वडिलांच्या नावे अटक वॉरंट घेऊन पोलीस दारात हजर झाले. घरात समारंभ आहे, म्हणजे कर्ता पुरुष घरात असणारच, हे पोलिसांनी हेरले होते. 'घरात नाहीत' हे कारण चालणार नव्हते. मग वडिलांऐवजी धाकट्या काकांनी स्वत:ला अटक करून घेतली. सहा महिने ते तुरुंगात होते. वडिलांचाच नाही, तर सगळ्या घराचा संघाशी संबंध आला तो असा.

नोकरीच्या निमित्ताने वडिलांना खूप फिरावे लागायचे. बदल्या व्हायच्या. त्यामुळे वडिलांना संघ किंवा परिवारातले कुठले निश्चित असे पद मिळाले नाही, पण याही काळात त्यांचा स्वत:चा संघ-संपर्क चांगलाच दांडगा होता. पुण्यात, मुंबईत नोकरीनिमित्ताने आले तेव्हा सुरुवातीची काही वर्षे ते संघकार्यालयातच राहिले होते. त्यामुळे संघाच्या उच्चस्तरीय पदाधिकाऱ्यांमध्ये त्यांचा वावर असायचा. परभणीला घरीही अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी यायला लागले आणि घराला 'संघवाल्यांचे घर' अशी ओळख प्राप्त झाली.

मी परभणीला आजीकडे राहायचो. वडील नोकरीच्या निमित्ताने पुणे आणि मग मुंबईला. लहानपणापासूनच वडील म्हणून ते फारसे वाट्याला आलेच नाहीत. पण संघाची ओळख झाली ती त्यांच्याकडूनच. वडील सतत कुटुंबापासून दूर राहिले, तरी परभणीला त्यांनी कष्टाने घर उभारले आणि आम्ही नव्या घरात राहायला गेलो. तेव्हा बाजूलाच एक संघशाखा भरायची. आजूबाजूची मुले जायची, तसा मीही शाखेत जायला लागलो. घरातूनही शाखेत जाण्याला प्रोत्साहनच मिळत गेले.

संघ म्हणजे शाखा. संघ म्हणजे धर्मरक्षण. संघ म्हणजे देशसेवा. दररोजच्या एक तास शाखेत जाण्याने आपण काहीतरी उच्च ध्येयच साध्य करणार आहोत, हे त्याच वयात मनात रुजवले गेले. साधा स्वयंसेवक ते संघ कार्यकर्ता हा प्रवास व्हायला मला फारसा वेळ लागला नाही. मग गट-प्रमुख—शाखेचा मुख्यशिक्षक—शाखेचा कार्यवाह—मंडल कार्यवाह आणि शहर बौद्धिक-प्रमुख ही पदे (संघाच्या भाषेत जबाबदाऱ्या) त्या पुढच्या पाच वर्षांतली. वयाच्या बाराव्या वर्षापासून ते विसाव्या वर्षापर्यंत, सतत आठ वर्षे माझा संघाशी साक्षात आणि सक्रिय संबंध आला आणि याच काळात मी अयोध्येचा कारसेवकही बनलो.

मी संघात नियमितपणे जायला लागलो, त्यावेळेस माझे वय जेमतेम बारा वर्षे होते. कुठलाही प्रभाव चटकन आत्मसात करण्याचेच ते वय. संध्याकाळी मैदानावर मुले जमतात, नवनवे खेळ खेळतात, देशभक्तीपर गोष्टी सांगतात, कधीतरी कुणाचे भाषण होते, दररोज भगव्या झेंड्यासमोर प्रार्थना म्हणायची—त्याचे नाव शाखा. मुले शिस्तबद्ध वागतात, वक्तशीर बनतात, खेळण्याच्या वयात देशाचा विचार करायला लागतात, त्याग-समर्पण-धर्मनिष्ठा शिकतात. इथे माणूसच तर घडवला जातो, अशी शाखेबद्दलची (संघाबद्दलची) माझीही कल्पना झाली होती.

घरातले वातावरण, संघात हळूहळू मला मिळू लागलेला अवसर यातून मी पुरता संघवाला बनू लागलो होतो. मैदानी खेळांकडे माझा ओढा तसा कमीच. मग मी संघाच्या बौद्धिकांकडे आकर्षित होऊ लागलो. संघाच्या छोट्या-मोठ्या शिबिरांतून जायला लागलो होतोच. हळूहळू वेगवेगळ्या उपक्रमांच्या नियोजनातही मला सहभागी करून घेतले जाऊ लागले. दहावीची परीक्षा संपते ना संपते, तोच मला संघाच्या प्रशिक्षण शिबिराच्या प्रथम वर्षाला जाण्याची गळ घातली गेली आणि मी गेलोही. मग दोन वर्षांनी द्वितीय वर्ष पूर्ण केले. त्यानंतर विविध जबाबदाऱ्या माझी वाट पाहतच होत्या.

संघाच्या कार्यकर्त्यांसाठी एकेक महिना कालावधीची तीन प्रशिक्षण शिबिरे असतात. त्याला अनुक्रमे प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीय वर्ष असे म्हणतात. संघाचा कट्टर कार्यकर्ता होण्याची एकेक पायरीच असते ती. मी संघाचा द्वितीय वर्ष स्वयंसेवक बनलो. संघाचा रीतसर स्वयंसेवक बनलो. संघवाला बनून गेलो.

❑

१९८९-९०चा तो काळ. मंडल आयोगाने देशभरातले वातावरण ढवळून निघाले होते. शहाबानो केस गाजत होती. अस्थिर सरकारांचे युग सुरू झाले होते. देश राजकीय-आर्थिकदृष्ट्या कठीण परिस्थितीतून जात होता आणि त्याच वेळेस अयोध्या प्रश्नही तापायला सुरुवात झाली.

परभणीत त्यावेळेस संघाचे काम विस्तारत होते. बहुतेक कार्यकर्ते माझ्याच वयाचे तरुण. दुसऱ्या बाजूला विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, दुर्गा वाहिनी, राष्ट्र सेविका समिती, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, जनकल्याण समिती इत्यादी संघ परिवारातील अन्य संघटनांनीही परभणी जिल्ह्यात आपले बस्तान बसवले होते. राम जन्मभूमीच्या मुद्यावर अनेक छोट्या-मोठ्या सभा घेऊन लोकांना उकसवले जात होते.

'पाचशे वर्षांपूर्वी बाबर नामक मुस्लीम आक्रमकाने अयोध्येतील रामजन्मभूमीस्थान उद्‌ध्वस्त केले. हा हिंदूंच्या अस्मितेवरच हल्ला होता आणि त्या जागी एक मशीद बांधली. हीच ती बाबरी मशीद. आपल्या समाजावर असलेला तो कलंक आहे. तो बघून तुमचं पित्त खवळत नाही काय? बाबराची औलाद आज समाजातही आहे आणि सरकारातही. हिंदू बहुसंख्य असूनही त्यांचा पदोपदी अवमान केला जात आहे. मुसलमानांचे लाड पुरवले जात आहेत. अयोध्या प्रश्नावर अनेक निवेदने करूनही सरकार फक्त चर्चेचेच

गुन्हाळ चालू ठेवू इच्छित आहे. हा प्रश्न चर्चेने सुटणार नाही. हा श्रद्धेचा विषय आहे. अयोध्या ही रामाची जन्मभूमी आहे ही कोट्यवधी हिंदूची श्रद्धा आहे. श्रद्धाविषयांत न्यायालये हस्तक्षेप करू शकत नाहीत. न्यायालये पुरावा मागतात. ही कोट्यवधी जनताच त्याचा पुरावा आहे. सेक्युलर मंडळी विचारतात, रामाचा जन्म त्याच ठिकाणी झाला कशावरून? तुझा जन्म कुठे झाला हे तू कशावरून सांगतोस? तुझ्या आई-वडिलांनी सांगितलेले असते म्हणूनच ना? तसे आमच्या पूर्वजांनी सांगितलेय, हीच रामाची जन्मभूमी! उद्या विचाराल रामाचा बाप दशरथच कशावरून? तुम्ही विचारलेय कधी आईला की मी ज्याचे नाव लावतो तोच माझा बाप नक्की आहे का म्हणून?

'हिंदूंच्या भावनांशी सरकार खेळत आहे. आम्ही जगात सर्वाधिक सहिष्णू आहोत. पण आता खूप झाले. हा हिंदूंचा देश आहे. हिंदूंना न्याय मिळालाच पाहिजे. मिळत नसेल तर आपण तो झगडून घेतला पाहिजे. बाबरी मशिदीचा कलंक पुसून टाकला पाहिजे. अयोध्या तो झांकी है, काशी-मथुरा बाकी है. तुमचा एक खारीचा वाटा हिंदू राष्ट्राचा सेतू बांधणार आहे, लक्षात ठेवा. तुम्ही हिंदू आहात. तेव्हा गर्व से कहो हम हिंदू है! झुकू नका. धर्मयुद्धाची वेळ आली आहे. हिंदूंची शक्ती सरकारला दाखवून द्या. बोला—जय श्रीराम!'

यासारख्या भाषणांनी लोकांना पद्धतशीरपणे चिथावले जात होते. अनेक कार्यकर्ते घराघरांत जाऊन, प्रत्यक्ष भेटून हा प्रश्न लोकांना सांगत होते, आपली बाजू पटवून देऊ पाहत होते. मग अचानक कारसेवेची घोषणा केली गेली. कारसेवा म्हणजे काय,. किंवा नक्की काय करायचे? माहिती नव्हते. पण अयोध्येला जायचे आहे आणि हिंदू समाजावरील हा कलंक पुसून टाकायचा आहे, तेव्हा 'चलो अयोध्या', एवढेच लोकांना कळत होते. १९९०ची गोष्ट. परभणीची लोकसंख्या तेव्हा एक लाख सुध्दा नसेल, पण एकट्या परभणीतून सुमारे दीड ते पावणेदोन हजार कारसेवक अयोध्येला जायला निघाले. उर्वरित जिल्ह्यातून सुमारे तेवढेच कार्यकर्ते घराघरांतून फिरत होते.

माझ्या भागातले सुमारे दोनेकशे जण कारसेवेला निघाले. त्यात काही निवृत्त आजोबा होते, बायका होत्या, कॉलेजवयीन तरुण मुले होती. माझ्या घरातून तर खुद्द माझी आई आणि धाकटा काका या कारसेवेला निघाले. अयोध्येला जाण्याच्या कल्पनेने मी भारलो होतो, पण केवळ बारावीचे वर्ष असल्याने मला घरातून परवानगी मिळाली नव्हती.

125287

आई आणि काका कारसेवेला गेले. गावातले, माहितीतले कितीतरी जण गेले होते. कारसेवेची तारीख जसजशी जवळ येऊ लागली तसतशा मग रेडिओ, टीव्ही, वर्तमानपत्रांतून बातम्या येऊ लागल्या. उत्तरप्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री मुलायमसिंग यादव यांनी कारसेवकांना अयोध्येत जाण्यापासून रोखायला सुरुवात केली आहे, वगैरे. कारसेवक मग अधिक त्वेषाने अयोध्येच्या दिशेने कूच करीत राहिले. अयोध्येकडे जाणारी सगळी वाहने रोखली गेली. कारसेवक दिवस-दिवस, मैलोन् मैल पायी चालायला लागले. एकच ध्यास — अयोध्या! मग मुलायमसिंगांनी कारसेवकांना पकडून डांबायला सुरुवात केली. तर तुरुंग कमी पडू लागले. शाळा, धर्मशाळा यांनाच तात्पुरते तुरुंग बनवले गेले आणि अयोध्येच्या दिशेने जाणाऱ्या हजारो कारसेवकांना आसपासच्या अनेक शहरांत स्थानबद्ध करण्यात आले. पोलीस बंदोबस्त कडक होता. सैन्याच्या तुकड्याही होत्याच आणि तरीही काही कारसेवक, सगळ्या अडथळ्यांवर मात करीत कारसेवेच्या दिवशी, २ ऑक्टोबर १९९० रोजी, अयोध्येत पोचलेच; तेव्हा त्यांच्यावर लाठीमार केला गेला. अयोध्येत पोचणाऱ्या कारसेवकांची संख्या कमी नव्हती. पोलिसांना, मोजक्या सैनिकांना त्यांना आवरणे कठीण जात होते. तेव्हा हवेत बंदुकीच्या फैरी झाडाव्या लागल्या. विश्व हिंदू परिषदेच्या अशोक सिंघल आदी नेत्यांना धक्काबुक्की झाली, ते रक्तबंबाळ झाल्याचे फोटो छापून आले आणि मग विश्व हिंदू परिषदवाल्यांनी या गोष्टींचे चांगलेच भांडवल केले.

मुलायमसिंग यादव हे मुस्लीमधार्जिणे आहेत. हिंदूविरोधी आहेत. कारसेवक अयोध्येत २ ऑक्टोबर रोजी केवळ शांततापूर्ण कारसेवा करणार होते, परंतु मुलायमसिंग सरकारने निष्पाप कारसेवकांना कशी अमानुष वागणूक दिली याचे रसभरीत वर्णन केले गेले. त्याचे व्हिडिओ तयार करून देशभरात जागोजागी दाखवले गेले. रामजन्मभूमी आंदोलनाला लोकांचे दुप्पट बळ मिळाले. सरकारला करावी लागलेली कठोर उपाययोजना आणि संघवाल्यांनी त्याचा चतुराईने केलेला अपप्रचार याने धर्मनिरपेक्ष शक्ती अधिक क्षीण झाल्या. केंद्र सरकार अस्थिरतेने ग्रासलेले होते. मंडल आयोगामुळे उसळलेल्या जातीय दंगलींनी समाज-राजकरण पारच बदलून गेले होते आणि याच सगळ्या वातावरणात हिंदुत्ववादी प्रवृत्ती फोफावल्या. या गोष्टींनी राजकीय ध्रुवीकरण करायलाही वेगाने सुरुवात केली. सगळेच राजकीय पक्ष या अनपेक्षित वेगवान घटनाक्रमांनी भांबावलेले होते, पण हिंदुत्ववाद्यांना मात्र आता 'हिंदू राष्ट्र' नजिक आल्याचा भास होत होता. ते पुढच्या तयारीलाही लागले.

आई आणि काका या आवर्तात कुठे सापडले म्हणून आम्ही घरी त्यांची काळजी करीत होतो. घरी फोन नव्हता. बहुतेकांच्या घरी नव्हता. गावातून गेलेल्या अनेक गटांचीही ताटातूट झाली होती. टीव्ही—रेडिओ—पेपरच्या बातम्यांनी लोकक्षोभच निर्माण केला होता. एक-दोन, एक-दोन निरोप येऊ लागले. तेही 'आम्ही आता अयोध्येत गेल्याशिवाय परतणार नाही, काळजी करू नका' या आशयाचे. अधिकच काळजी वाटायला लागली.

माझी आई आणि तिचे सोबती सलग पाच दिवस रानावनातून मैलोन् मैल चालत होते. तरीही अयोध्येच्या अलीकडेच त्यांना डांबण्यात आले. २ ऑक्टोबरला कारसेवा होती. त्यांच्यापैकी कुणालाच अयोध्येत पोचता आले नाही. ३ ऑक्टोबरनंतर हळूहळू, थोडे थोडे करून कारसेवकांना मुक्त केले जाऊ लागले. आणि असे करत आई ५ ऑक्टोबरला अयोध्येत पोचली. तिथून मात्र रेल्वेने परत.

१० ऑक्टोबरनंतर ताटातूट झालेले कारसेवकांचे अनेक गट परतू लागले. स्थानिक कार्यकर्त्यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. त्यांचे छोटे मोठे सत्कार समारंभ घडवून आणले. आणि एरवी घरात केवळ 'गृहिणी' बनून राहिलेल्या, घराबाहेरचे विश्व क्वचितच माहीत असलेल्या अशा बायका सत्काराने भारून गेल्या. मुलायमसिंग सरकारच्या दडपणाच्या रसभरीत कहाण्या जाहीर सभांतून सांगू लागल्या; एवढे बळ त्यांच्याकडे आले. लोकमानसावर याचा विलक्षण परिणाम होत होता. त्या मागोमाग व्हिडिओ कॅसेटस् आल्या. त्यांनी पुन्हा हाच इतिहास चघळला. बहुतांश प्रसारमाध्यमे हिंदुत्ववादाला अनुकूल नसतानाही, हिंदुत्ववाद्यांनी आपला विलक्षण प्रभाव आपल्या छोट्या छोट्या उपक्रमांतून वाढवला. व्हिडिओचे युग ऐन भरात होते. त्याचा वापर केला. दिमतीला माझ्यासारखे तरुण कार्यकर्ते होतेच. वाढतच होते.

तोवर मी संघाचा मंडल कार्यवाह, म्हणजे एका परिसराचा प्रमुख झालो होतो. घरातल्या कारसेवेच्या कहाण्यांनी मी पुरता भारलेला होतो. संघाच्या शाखांतून रामजन्मभूमीवरची प्रखर बौद्धिके सुरू झाली. मंदिर-मशीद हा खेळही शाखांतून खेळला जाऊ लागला. एक झाड—ते म्हणजे मशीद. त्यावर एक ध्वज लावायचा (काठीला रुमाल बांधून केलेला झेंडा). दोन गट करायचे. एकाने तिथपर्यंत पोहचून, झाडावर चढून झेंडा लावायचा, दुसऱ्या गटाने ते प्रयत्न हरतऱ्हेने हाणून पाडायचे. हाच 'मंदिर-मशीद' खेळ; आणि मुलंही हा खेळ शाखांतून खेळू लागली.

संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी जिल्हा पुन्हा एकदा पिंजून काढला. मी त्या मानाने खूपच छोटा कार्यकर्ता होतो. तरी माझ्याकडे माझ्या तीन किलोमीटर परिसरातील सगळ्या घरातल्या मुलांच्या नावांची संपूर्ण यादी (संघात त्याला 'पट' म्हणतात) तयार होती. असे एकही घर नव्हते, की जिथे मी गेलो नव्हतो. लोकही मला नावानिशी ओळखत होते. पूर्वी मी मुलांना 'शाखेत चला' असे सांगण्यासाठी त्या घरात जात होतो, आता त्यांच्या आई-वडिलांना 'अमुक एका भाषणाला चला', 'अयोध्येला चला' असे आवाहन करायला जाऊ लागलो. गावा-गावांतून संघ परिवारातल्या बड्या नेत्यांच्या जाहीर सभा आयोजित केल्या गेल्या. अशोक सिंघल, धर्मेंद्रजी, ऋतंभरा, उमा भारती या नेत्यांचा दौरा झाला. त्यांच्या ज्वलंत भाषणांनी लोक भारून गेले आणि आता दुसऱ्यांदा, १९९२मध्ये पुन्हा एकदा कारसेवा घोषित केली गेली. मी त्यावेळेस कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला होतो. आता म्हणजे वेळच होता. मीही कारसेवक म्हणून अयोध्येला निघालो.

❑

*हमे इस बात का डर नही है*
*कि लोग कितने बिखर जाएँगे,*
*डर यह है कि नितान्त गलत*
*कामों के लिए कितने बर्बर*
*ढंग से संगठित हो जाएँगे।*

— दूधनाथ सिंह

*('आखिरी कलाम' या अयोध्या प्रश्नावरील कादंबरीच्या प्रस्तावनेतून)*

मला अयोध्येला का जावेसे वाटले असेल?

फक्त भोवतालच्या वातावरणाचा प्रभाव म्हणून? ९०च्या कारसेवेतील अडथळे आईच्या तोंडून ऐकले होते. काकांच्या सुजलेल्या पायांनी सांगितले होते. वर्तमानपत्र, संघवाले, व्हिडिओ यांनी मला ते दाखवले होते. तरीही हे धोके गृहीत धरून मी स्वत:ला या कारसेवेत झोकून दिले होते. त्याच्या तयारीपासूनच. का? कुठलीही प्रलोभने नव्हती, महत्त्वाकांक्षा नव्हती, नेतृत्वही मी करत नव्हतो. मग का प्रवृत्त झालो असेन? तर हिंदुत्ववादी विचारांनी

मी पुरता भारावून गेलो होतो. विचारपूर्वक विचारसरणी स्वीकारण्याचे वय नसतेच ते. माझेही नव्हते. केवळ त्याच त्या विशिष्ट बौद्धिकांनी माझा वैचारिक ताबा घेतला होता.

'हिंदुत्ववाद म्हणजेच राष्ट्रवाद' ही संघाची मध्यवर्ती आणि एक लाडकी विचारसरणी आहे. तिचा थोडक्यात आशय असा : 'हिंदू हा केवळ एक उपासनापंथ नसून ती एक व्यापक-उदात्त-सहिष्णू-सर्वसमावेशक जीवनप्रणाली आहे. संस्कृती कशाशी खातात हे जगाला माहीतही नव्हते, अशा काळात भारत मात्र सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत समृद्ध अवस्थेत होता. अनेक प्रकारच्या विचारसरणी इथे एकत्र नांदल्या. एकेकाळी इथे सोन्याचा धूर निघत होता, तत्त्वज्ञाने-कला-विज्ञाने विकसित अवस्थेत होती, पण आपण कालांतराने स्वत्व विसरलो. काही दोषही आपल्यात उत्पन्न झाले आणि अशाच काळात मुस्लीम आक्रमकांनी भारतावर आक्रमण केले. आपले विचार—संस्कृती नष्ट करण्याचा हरतऱ्हेने प्रयत्न केला. मंदिरे फोडली, नगरे लुटली, ग्रंथ जाळले, लोकांचा छळ केला, राज्य प्राप्त केले. हिंदू कधीही कुणावर चालून गेला नाही. मुस्लीम-ख्रिश्चन आदी धर्मांचा इतिहासच प्रत्यक्ष वा छुप्या आक्रमणांचा आहे. हे आक्रमक धर्म आहेत. भारताला इस्लाममय करणे, ख्रिश्चन धर्मीय करणे हे त्यांचे ध्येय आहे. मदरसे, मिशनरीजच्या माध्यमातून आजही त्यांच्या अशाच राष्ट्रविघातक कारवाया चालू आहेत. मुस्लीम, ख्रिश्चन हे परकीय आक्रमक आहेत, तेव्हा त्यांच्या निष्ठा आजही परकीय आहेत. हिंदू 'वनवासी' बांधवांना बळजबरीने—प्रलोभने दाखवून धर्मांतरित केले जात आहे. धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर. तेव्हा हा धोका वेळीच ओळखून हिंदूंनी संघटित होणे गरजेचे आहे. हिंदू सबळ झाल्याखेरीज हे प्रश्न सुटणार नाहीत. या देशात हिंदू बहुसंख्य असताना सरकारने मात्र धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली हिंदूंची सतत गळचेपीच केली आहे. धर्मनिरपेक्षता म्हणजे मुस्लीमधार्जिणेपणाच आहे. तेव्हा देशात हिंदू राज्य अवतरल्याशिवाय हा देश जगात पुनश्च ते गौरवपद प्राप्त करू शकणार नाही. हिंदुत्ववाद हाच या देशाचा कणा आहे.'

हे सिद्धान्तन म्हणजेच हिंदुत्ववाद. यालाच ते 'सांस्कृतिक राष्ट्रवाद' असेही म्हणतात. रामजन्मभूमीसारखा प्रश्न केवळ धार्मिक न मानता त्याला राष्ट्रीय अस्मितेचे स्वरूप दिले जाते आणि राष्ट्रवादाच्या नावाने धार्मिक राजकारण केले जाते. हिंदुत्ववाद्यांचा 'सांस्कृतिक राष्ट्रवाद' धर्म-राष्ट्र-शासन-संस्कृती आणि इतिहास यांच्याविषयीच्या अपुऱ्या एकांगी आकलनातून निपजला आहे. अथवा तो जाणीवपूर्वक बुद्धिभेदाचा प्रकार तरी असावा.

वरील सिद्धान्तनात उघडच अनेक तार्किक गोंधळ आहेत. संस्कृती आणि धर्म या दोनही शब्दांमागे 'हिंदू' हा शब्द ठेवून शाब्दिक लबाडी केली जाते. हिंदुत्वावरची श्रद्धा ही राष्ट्रनिष्ठेची पूर्वअट मानणारी आक्रमक वृत्ती आहे.

इथे एक वेगळ्या संदर्भातले, पण समांतर उदाहरण आठवते. संघाच्या एका ज्येष्ठ पदाधिकाऱ्याने आपल्या बौद्धिकात दिलेले हे उदाहरण आहे. एकदा एका संघ स्वयंसेवकाने गुरुजींना (संघाचे द्वितीय सरसंघचालक माधव सदाशिव गोळवलकर यांना संघात 'गुरुजी' याच नावाने ओळखले जाते. संघाची वैचारिक (?) बैठक गुरुजींनीच घालून दिली. संघाचे बहुतांश आजचे स्वरूपही त्यांच्याच विचारांचे फलित आहे. आक्रमकतेसह.) प्रश्न केला की, "हिंदू राष्ट्राविषयी कुणाकडे बोलायला गेले की काही लोक (हिंदुत्ववाद्यांची लाडकी शिवी वापरायची तर 'तथाकथित बुद्धिवादी' लोक) त्यातील 'हिंदू' या शब्दालाच आक्षेप घेतात. त्यांचे म्हणणे असते की भारत हा एक धर्मनिरपेक्ष देश आहे, तो फक्त हिंदूंचा नाही. 'हिंदू' या शब्दाचे सोवळे असल्यागत ते पुढे काही ऐकूनच घेत नाहीत. यावर काय करायचे?" त्यावर गुरुजींनी दिलेले उत्तर मोठे मासलेवाईक आहे. ते म्हणाले, "...अशा लोकांसमोर चर्चेपुरता 'भारत' शब्दही वापरायला हरकत नाही, पण आपल्या मनात, वर्तनात व कार्यात मात्र ते 'हिंदू राष्ट्र'च आहे व राहील हे कायम भान बाळगा." धर्म-संस्कृती यातील गल्लत ही या प्रकारच्या धोरणीपणातून आली असेल काय?—मग त्याला गल्लत तरी कसे म्हणणार? अशास्त्रीयता, अनैतिहासिकता, धोरणीपणा हे हिंदुत्ववादाचे आधार आहेत. इतिहास आणि वर्तमानाचे एकांगी चित्र उभे करून हिंदुत्ववाद्यांनी आपली विचारसरणी पसरवली आहे.

इतिहास गौरव, अशास्त्रीय सिद्धान्त, पूर्वग्रहदूषित दृष्टी आणि बहुसंख्याकवादाचे राजकारण हा पाया असलेला राष्ट्र-राज्यवाद ही हिंदुत्ववादाची महत्त्वाची लक्षणे आहेत. असा हा हिंदुत्ववाद ना धर्माची प्रतिष्ठापना करणारा आहे, ना धर्माची सुधारणा करणारा! संस्कृती म्हणजे त्यांच्या दृष्टीने फक्त इतिहास गौरव. संस्कृतिप्रणीत मानवीय मूल्ये ही कुणा एका धर्माची मक्तेदारी नसते, अथवा ती मग केवळ त्या संस्कृतीचीही राहत नाही. मानवकल्याणाचा विचार करणारी संस्कृती आक्रमक कशी काय असू शकेल? तेव्हा हिंदुत्ववादी विचारसरणी ही धार्मिक असण्यापेक्षा राजकीयच अधिक आहे, हे स्पष्ट होते. सांस्कृतिक तर ती मुळीच नाही. थोडक्यात, हिंदुत्ववाद म्हणजे हिंदू वर्चस्वाचे राजकारण. पण हे समजायला मला अजून बराच उशीर होता. त्याआधी एक

दुष्कृत्य हातून घडायचे होते. काळ्या इतिहासाचा भागीदार बनायचे होते : मी ६ डिसेंबर १९९२च्या कारसेवेसाठी अयोध्येकडे रवाना झालो.

❑

यावेळच्या कारसेवेसाठी संघ परिवाराने आपली सगळी शक्ती पणाला लावल्याचे दिसत होते. ९०च्या कारसेवेच्या तुलनेत यावेळचा आकडा अधिक होता. त्यात हौसे-नवसे-गवसे सगळेच लोक होते. कारसेवकांना निरोप देण्यासाठी स्टेशनवर प्रचंड गर्दी लोटली होती. 'जय श्रीराम', 'मंदीर वही बनायेंगे' यासारख्या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला होता. मला निरोप देण्यासाठीही माझ्या ओळखीचे बरेच जण आले होते. त्यात माझा एक मित्र महेश होता. स्टेशनवरचे वातावरण पाहिले मात्र, त्याने तिथेच निर्णय घेतला, आपणही अयोध्येला जायचे. अगदी गाडी निघता निघता तो गाडीत चढला, तसा मी म्हणालो, "अरे महेश, गाडी सुरू झाली. उतर." त्यावर अगदी बेफिकीर स्वरात तो म्हणाला, "मीही अयोध्येला येतोय." मला आधी वाटले, थट्टाच करतोय, पण गाडीने वेग घेतला, तरी तो उतरेना. गर्दीत त्याच्या भावाला त्याने ओरडून सांगितले, "घरी आई-दादांना सांग, मी अभिजितसोबत अयोध्येला गेलो म्हणून." बस्स इतकेच! आणि तो खरेच अयोध्येला आला.

त्याने सोबत कुठलेही सामान घेतलेले नव्हते. अगदी शर्ट-पॅन्ट-टॉवेलसुद्धा. डिसेंबर महिना म्हणजे उत्तर भारतात थंडी असणार होती, पण 'अभिजित ॲडजस्ट करेलच की' अशी त्याची बेफिकिरी होती. खिशातही वीस-तीस रुपयांपेक्षा जास्त नव्हते. माझ्याकडेही मोजकेच पैसे होते, पण मित्रच तो. नव्हे, कारसेवक-बंधूच तो. रामासाठी अयोध्येला येतोय म्हणजे ॲडजस्ट करावेच लागणार. केले. खरे तर महेश मुळातच भटक्या वृत्तीचा. घरच्या आर्थिक चणचणीमुळे त्याला कुठेच जायला मिळायचे नाही. फारसा शिकला नाही. उनाड मुलांत वेळ घालवलेला. चार दोन नोकऱ्या-उद्योग करून पाहिले, पण रमला नाही अथवा जमले नाही. फसला, त्यानेही लोकांचे पैसे बुडवले. केवळ 'बेकार' एवढीच त्याची ओळख पुरेशी नाही. घरातूनही तो 'नालायक' म्हणून हिणवला गेलेला. एकूण सर्वत्र अलक्षित. इथे गर्दीत का असेना, त्याला कौतुकाचे वातावरण मिळत होते. संघाशी तर त्याचा सुतराम संबंध नव्हता. देवभक्त कॅटेगिरीतही बसणारा तो नव्हता. माझी-त्याची मैत्रीही खरे तर संघाबाहेरची आणि तशी जुजबीच होती, पण तरी तो आला. तर असे गवसे लोकही कारसेवेत होते. अयोध्येला जायचे म्हणजे फुकट जायला

मिळणार होते. 'जय श्रीराम' हेच तिकीट. खायलाही मिळायचे. चहापाण्यापुरता खर्च केला की झाले. अयोध्या, आजूबाजूची इतर शहरे असे बरेच त्यानिमित्ताने भटकायला मिळणार होते, म्हणूनही बरेच जण आले होते. संघ, विश्व हिंदू परिषद यांच्या विचारसरणीशी त्यांचा काहीही संबंध नव्हता. असलीच तर रामावरची श्रद्धा होती; सगळ्यांसोबतच जायचंय, तर करू काहीतरी, असा भाव होता. अशा वातावरणामुळे आकडा फुगला होता. संघवाल्यांनी मात्र हिंदुत्ववादाला लोकांचा पाठिंबा मिळू लागला आहे, असा त्याचा सोयीस्कर अर्थ काढला. निष्ठावान, तात्पुरत्या, संबंधही नसलेल्या, नवसंबंध प्रस्थापित करू पाहणाऱ्या, 'चला भटकून तरी येऊ' म्हणून आलेल्या अशा नानातऱ्हेच्या कारसेवकांना घेऊन गाडी अयोध्येच्या दिशेने धावू लागली. इतिहासाने नोंद घेतली ती फक्त कारसेवकांच्या संख्येची आणि त्यातून पुढे घडलेल्या महाभारताची; पण त्यांच्या येण्यामागच्या प्रेरणा अशाही होत्या, हे मग बिनमहत्त्वाचेच ठरून गेले.

❑

२९ नोव्हेंबर १९९२. परभणीहून माझा अयोध्येसाठीचा प्रवास सुरू झाला. नुकतीच त्या वर्षीची माझी डायरी सापडली. डायरीतल्या नोंदी अगदी त्रोटक आहेत. त्यावरून घटनांचे तपशील किंवा माझ्या संपूर्ण मन:स्थितीची कल्पना येत नाही, पण घटनांचा काही एक आराखडा मिळतो. डायरीतील मजकूर आहे तसा :

**२९ नोव्हेंबर १९९२ / रविवार**

सकाळी उठून आवरलं. श्रीचं दर्शन. सगळ्यांचा निरोप घेऊन अयोध्येकडे कारसेवेसाठी रवाना. पूर्णामार्गे रात्री अडीचपर्यंत खांडव्याला. तिथेच रात्रीचा मुक्काम.

**३० नोव्हेंबर १९९२ / सोमवार**

सकाळी आवरून इटारसी, जबलपूरमार्गे अलाहाबाद (प्रयागला) प्रयाण. स्टेशनवरच मुक्काम.

**१ डिसेंबर १९९२ / मंगळवार**

सकाळी संगमाचे स्नान. दुपारी जेवण आटोपून स्टेशनवर. तिथे लालकृष्ण अडवाणी, प्रमोद महाजन इत्यादी मान्यवरांचे भाषण झाले. अलाहाबादहून संध्याकाळी अयोध्येकडे रवाना. रात्री एक वाजता अयोध्येत. स्टेशनवरच

मुक्काम.

**२ डिसेंबर १९९२ / बुधवार**

सकाळी अयोध्येत महाराष्ट्रातील कारसेवकांसाठी उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या निवासस्थानी—रामघाटावर. स्नान, जेवण आटोपून अयोध्या भ्रमण. रामजन्मभूमीचे दर्शन. तथाकथित बाबरी मशीद पाहिली.

संध्याकाळी जेवण आटोपून, संघामार्फत उभारण्यात आलेल्या निवास व भोजनव्यवस्थेत काम केले. अयोध्येत मोठ्या प्रमाणावर कारसेवक यायला सुरुवात झाली आहे.

**३ डिसेंबर १९९२ / गुरुवार**

सकाळी आटोपल्यावर सर्व कारसेवकांना संचलन करीत जन्मभूमीकडे नेण्यात आले. तिथे मान्यवरांचे उद्‌बोधन. परतल्यावर जेवण, झोप.

**४ डिसेंबर १९९२ / शुक्रवार**

उठून स्नान. सर्व ग्रुपसोबत अयोध्या भ्रमण. मंदिरे-घाट-कुंड इत्यादी. कारसेवकांची संख्या वाढतेच आहे. संध्याकाळी विश्व हिंदू परिषदेच्या कार्यालयात मा. सुदर्शनजी, मा. सिंघलजी, मा. शेषाद्रीजी यांना जवळून पाहिले. आज रामधून गात तल्लीन होऊन नाचलो. दृष्ट लागण्याइतका. रात्री आठ ते बारा निवासी परिसरात रक्षक म्हणून व्यवस्थेत काम केले. झोपायला एक वाजला.

**५ डिसेंबर १९९२ / शनिवार**

सकाळी प्रार्थनेच्या वेळेस चक्कर आली. दिवसभर अस्वस्थ वाटत होतं. तापही होता. निवास परिसरातच आचार्य धर्मेंद्रजी यांचं वीरश्रीपूर्ण भाषण. आजही सर्व कारसेवकांना रामजन्मभूमीवर शिस्तबद्धपणे नेण्यात आलं. आजही बरेच कारसेवक अयोध्येत आले. परभणीहून दुसरी तुकडीही पोहोचली. ताप असल्याने लवकरच झोपलो.

**६ डिसेंबर १९९२ / रविवार**

सर्वात महत्त्वाचा दिवस. सकाळी आठ वाजल्यापासूनच जन्मभूमीच्या ठिकाणी भाषणे ऐकली. दुपारी बारा वाजता कारसेवकांमार्फत मशीद तोडण्यास प्रारंभ. मीही प्रत्यक्ष सहभाग घेतला नि मशीद तोडफोडीच्या रूपाने प्रत्यक्ष कारसेवा केली. संध्याकाळी पाच वाजेपर्यंत मशीद जमीनदोस्त झाली. अयोध्येत अक्षरशः दिवाळी साजरी झाली.

संध्याकाळी कल्याणसिंग सरकार बरखास्त. संचारबंदी लागू. जेवण. रेडिओवर बातम्या ऐकल्या. झोपायला उशीर झाला.

**७ डिसेंबर १९९२ / सोमवार**

मध्यरात्री अडीच वाजताच झोपेतून उठवून कारसेवकांना पुन्हा जन्मभूमीकडे नेण्यात आले. तिथे राममंदिराचे पुरावे सापडले.

सकाळीही तिथे कारसेवा. खणणे, माती बाजूला करणे इत्यादी. परतून जेवण. सामानाची आवराआवर करून स्टेशनवर. तिथे गर्दी. रात्री आठच्या गाडीने अलाहाबादला रवाना.

**८ डिसेंबर १९९२ / मंगळवार**

सकाळी अलाहाबादला. आवरून तिथून खांडव्याला रवाना. प्रवास एकंदरीत ठीकच झाला. बातम्या मात्र अस्वस्थ करणाऱ्या. देशभरात दंगली उसळल्या. बहुतेक ठिकाणी संचारबंदी लागू झाली. अनेक लोक मेले, इत्यादी. रात्री खांडव्याला पोहोचलो. तिथेच मुक्काम.

**९ डिसेंबर १९९२ / बुधवार**

सकाळी आटोपून आठच्या गाडीने पूर्णेकडे प्रस्थान. रात्री आकरा वाजता पूर्णेला. पुढील गाडी नसल्याने पूर्णा स्टेशनवरच मुक्काम.

**१० डिसेंबर १९९२ / गुरुवार**

सकाळी आठच्या गाडीने परभणीला रवाना. परभणीतही संचारबंदी. तरीही लोकांनी कारसेवकांचे भव्य स्वागत केले. घरी भेटायला येणाऱ्यांची तर रीघ लागली. स्नान, जेवण, विश्रांती. संध्याकाळी पुन्हा खूप जण भेटायला आले.

रात्री परभणीत, आमच्या भागात, दंगे उसळल्याचे कळले. म्हणून काठी घेऊन, कॉलनीतले सगळे तरुण बाहेर पडले. सुदैवाने कुठे काही झाले नाही. पण सगळ्यांनी हातात शस्त्र घेऊन कॉलनीत गस्त घातली. यानिमित्ताने का होईना, हिंदूंची शक्ती दिसून आली. झोपायला रात्री दोन वाजले.

ता. क. : सरकारने आज संघावर बंदी आणली.

डायरीतून प्रवास कळतो, घटना कळतात, पण त्याची भीषणता लक्षात येत नाही. मात्र त्याचे बीज माझ्या मनात पडले होते, एवढे नक्की.

❑

६ डिसेंबर १९९२ रोजी नक्की काय घडले अयोध्येत?

माझ्या सगळ्या डायरीत मी 'जन्मभूमी' असाच उल्लेख केलाय. तीच बाबरी मशीद. सकाळी आठ वाजता आमची तुकडी तिथे पोचली तेव्हा परिसर लाखो कारसेवकांनी फुलून गेला होता. दूर स्टेजवर रामनामसंकीर्तन, भजन-कीर्तन चालू होते. मग दहाच्या सुमारास विविध नेते व्यासपीठावर यायला सुरुवात झाली. त्यात लालकृष्ण अडवाणी, साध्वी ऋतंभरा, अशोक सिंघल, विनय कटियार, उमा भारती, मुरली मनोहर जोशी, आचार्य धर्मेंद्रजी इत्यादी नेते होते. एकेक करून ज्वलंत भाषणे सुरू झाली. आता ती भाषणे आठवत नाहीत. परंतु साधारण आशय असा : "बाबरी मशीद हा हिंदूंवरचा कलंक आहे... परिंदा भी पर नही मार सकता असं म्हणणाऱ्या मुल्ला मुलायमला धडा शिकवला पाहिजे... हिंदू आता गप्प बसणार नाहीत... रामजन्मभूमी लेकर ही रहेंगे... अयोध्या तो झांकी है, काशी-मथुरा बाकी है..." मधूनमधून घोषणाही दिल्या जात होत्या.

*'तेल लगाओ डाबर का - नाम मिटाओ बाबर का।'*

*'अयोध्या तो झांकी है - काशी-मथुरा बाकी है।'*

या प्रकारच्या घोषणा देण्यात आचार्य धर्मेंद्रजी, विनय कटियार, उमा भारती पुढे होते. सर्वाधिक चिथावणीखोर भाषणेही त्यांचीच होती.

एकूण किती कारसेवक असावेत याचा मी स्वत:च त्या जनसागरात असल्याने, अंदाज करता येणे कठीण आहे. सरकार, विश्व हिंदू परिषद किंवा प्रसारमाध्यमांनी सांगितलेला आकडाही आता लक्षात नाही. पण लाखो असावेत. पोलीस किंवा सैन्याच्या तुकड्या किती अपुऱ्या होत्या, याचा सहज अंदाज बांधता येतो. आम्ही १ डिसेंबरच्या मध्यरात्रीपासून अयोध्येत होतो, तरी पोलिसांची संख्या खूप काही लक्षणीय वाटली नाही किंवा कारसेवकांच्या संख्येने ती झाकोळून गेली असावी.

कुंभमेळ्यात दिसतात तसे नानातऱ्हेचे साधू, बाबा आणि एकाची भाषा दुसऱ्याला कळणार नाही असे विविध प्रांतांतले हजारो कारसेवक मात्र अयोध्येतल्या रस्त्यावरून भेटेल त्याला 'जय श्रीराम' म्हणत फिरत होते. अयोध्येत मुस्लिमांची संख्या नक्कीच मोठी असावी. पण या गर्दीत ती झाकली तरी गेली असेल किंवा जीव मुठीत घेऊन घरात तरी बसली असेल. तर अशा कारसेवकांनी गजबजलेला

सगळा परिसर घोषणांनी दुमदुमत होता.

दुपारी पावणेबाराच्या सुमारास काहीतरी हलकल्लोळ माजला. सुरुवातीला कुणालाच काही कळले नाही. मग कुणीतरी सांगितले, मशिदीवर कारसेवक चढले आहेत आणि भगवा झेंडा फडकवण्याचा प्रयत्न करत आहेत. संपूर्ण वातावरणात एकच उन्मादी लाट उसळली आणि मग पुन्हा अशाच असंख्य घोषणा. व्यासपीठावर काही नेते होते. 'कृपया, शांती रखिये', यापलीकडे त्यांनी काही आवाहन केले नाही. हा गोंधळ १०-१५ मिनिटे तरी टिकला. घोषणा चालूच होत्या. तोवर लक्षात आले, आता चार-दोनच नाही तर अनेक कारसेवक कुंपण भेदून, झाडावरून मशिदीवर चढून गेले आहेत. मग व्यासपीठावरूनही घोषणा दिल्या जाऊ लागल्या —'एक धक्का और दो, बाबरी मसजिद तोड दो'—अडवाणी, मुरली मनोहर जोशी दोन-तीन वेळा 'शांती रखिये'चे कोरडे आवाहन करून, व्यासपीठावरून निघून गेले होते; आणि बहुधा विनय कटियार, उमा भारती आदींनी व्यासपीठाचा व घोषणांचा ताबा घेतला होता. या घोषणेनंतर जो तो उन्मादाने भारलेला त्या मशिदीच्या दिशेने निघाला. तिथपर्यंत पोहोचण्यासाठी धडपडू लागला. थोड्या वेळाने व्यासपीठही ओस पडले. आता कारसेवकांच्या लाटा मात्र धडका मारीत होत्या.

गर्दीतून मार्ग काढत मी व माझे सहकारी दोन वाजण्याच्या सुमारास कुंपणाशी पोचलो. त्यावेळेस 'इथे गर्दी करू नका, शांतपणे काम करू द्या' असे सांगण्यासाठी विश्व हिंदू परिषद, बजरंग दलाचे कार्यकर्तेच कुंपणाशी होते. सर्वांनाच आत जाऊ देत नव्हते. मी तिथेच बराच वेळ रेंगाळलो. दुपारी साडेतीन-चारच्या सुमारास परत कुंपणाशी गेलो. आता मात्र माझ्या गटाला आत प्रवेश मिळाला. तोवर आत काय चालू आहे, याचा काहीच अंदाज येत नव्हता. आत मात्र अगदी व्यवस्थित शिस्तबद्ध काम चालू होते. कुदळ-फावडे घेऊन काही जण घाव घालत होते. टोपल्यांनी तो ढीग बाजूला करण्याचे काम इतर जण करीत होते. अगदी रांगेत. एखाद्या भव्य इमारतीचे बांधकाम चालते, तेव्हा जसे मजूर परस्पर समन्वयाने काम करतात, तसा समन्वय राखण्याचे कामही बजरंग दलाचे कार्यकर्तेच करत होते. फरक होता तो, इथे बांधकाम पाडले जात होते. नव्हे, भारताच्या इतिहासावरच घाव घातले जात होते. रात्रीपर्यंत मशीद भुईसपाट झाली.

❑

*हिंदू कहत है राम हमारा,*
*मुसलमान रहमाना।*
*आपस मे दोऊ लडे मरत है,*
*मरम कोई नहि जाना।।*

– कबीर

बाबरी मशीद ही 'वास्तू' पाडली गेली, याचे दुःख मला नाही किंवा ती पाडली याचा आनंदही नाही. मुद्दा या वास्तूच्या निमित्ताने दोन्ही धर्मांतील कट्टरपंथीय ज्या तऱ्हेने एकमेकांना भिडले, त्या आक्रमकतेचा आहे. या प्रश्नाच्या निमित्ताने दोन्ही कट्टरपंथीयांनी समाजाला वेठीला धरले, त्याचा आहे. म्हातारी मेल्याचे दुःख नाही, काळ सोकावण्याचा प्रश्न आहे. अलीकडच्या गुजरात दंगलीच्या निमित्ताने तसा तो सोकावल्याचे सिद्धही झाले आहे. बाबरी मशीद पाडली जाणे हा मुस्लीम धर्मावरील हल्ला नव्हता, तो भारताच्या धर्मनिरपेक्षतेवरचा हल्ला होता. हिंदू विरुद्ध मुस्लिम, मंदिर विरुद्ध मशीद... एवढ्याच परिघात आपण या प्रश्नाकडे पाहणार असू, तर आपण या प्रश्नाचा समग्र आवाकाच लक्षात घेतलेला नाही, असे म्हणावे लागेल.

या प्रश्नाला ठळक चार पक्ष आहेत :

हिंदुत्ववादी आणि मुस्लिम सनातनी/कट्टरपंथीय हे एकाच माळेचे मणी आहेत. सर्व हिंदू समाज म्हणजे हिंदुत्ववादी नव्हेत. आणि ८५ टक्क्यांच्या विविधतेचे प्रतिनिधित्व करण्याची सर्वसमावेशकताही हिंदुत्ववाद्यांकडे नाही. तेव्हा धर्माच्या नावाने राजकारण करण्यासाठी राममंदिराचा प्रश्न उपस्थित करणारे व त्याला वैचारिक-व्यावहारिक बळ देणारे आक्रमक बनलेले हिंदुत्ववादी हा या प्रश्नाचा एक मुख्य पक्ष.

ज्या मशिदीत गेली काही वर्षे नमाज होत नव्हता, जी नित्याच्या वापरातही नव्हती, बाबर नामक आक्रमकाने ती बांधली, ती जणू आपल्या अस्तित्वाचीच लढाई मानून अडाणी-निरक्षर-गरीब मुस्लिम बांधवांना त्यांच्या मूळ प्रश्नांपासून विचलित करणारे मुस्लिम कट्टरपंथीय या प्रश्नाचा दुसरा पक्ष.

हिंदूंनाही गोंजारायचे आणि मुस्लिमांनाही दुखवायचे नाही; दोघांचीही मते टिकली पाहिजेत या प्रेरणेने ह्या प्रश्नाकडे बघणारे, धर्मनिरपेक्षतेच्या व्यापक मुद्यापासून दूर गेलेले अथवा गोंधळलेले; अथवा या प्रश्नाला केवळ आपल्या राजकीय हित/अहिताच्या दृष्टीने बघून त्यावरची कठोर, आवश्यक ती

उपाययोजना टाळणारे, किंबहुना या प्रश्नाला आकार येत असताना त्याची व्यापकताच न समजलेले सरकार हा यातला तिसरा पक्ष.

चौथा पक्ष म्हणजे समाज. तो त्याच्या काळाच्या संदर्भातच समजून घेतला पाहिजे. मंडल आयोगाच्या शिफारशी अमलात आणल्यानंतर समाजाचे जातीय आणि राजकीय ध्रुवीकरण वेगाने झाले. हा केवळ जातीय-राजकीय तणाव नव्हता, तो व्यापक अर्थकारणाशीही जोडलेला होता. आर्थिक तणावातून भारताला योग्य रस्ता अजून दिसत नव्हता. विलक्षण अपेक्षाभंगाने ग्रासले जाण्याचा तो भग्न काळ होता. मुख्य प्रवाहातील राजकारणच समाजाने नाकारले होते. छोट्या छोट्या प्रादेशिक-आर्थिक आकांक्षांना नेतृत्व देणारे प्रादेशिक राजकीय पक्ष निर्माण झाल्याने केंद्रात राजकीय अस्थिरतेचे युग सुरू झाले होते. समाजाला विचार देणारे नेतृत्वच संपुष्टात आले होते. राजकीय नेतृत्वही खुजे होते. वैचारिक-सामाजिक चळवळी संपल्या तरी होत्या अथवा क्षीण तरी झाल्या होत्या. विचारबळांच्या अभावी येणारा सैरभैरपणा सार्वत्रिक झाला होता. असा हा गोंधळलेला, भग्न, नेतृत्वहिन, तणावग्रस्त समाज—तोच या प्रश्नाचा चौथा पक्ष.

हिंदुत्ववाद्यांच्या आक्रमकतेला बळ कुठून मिळाले? तर याच भग्न सामाजिक पर्यावरणातून. हिंदुत्ववाद्यांचे हे 'रामजन्मभूमी आंदोलन' खोट्या प्रश्नांवर उभे राहू शकलेले आंदोलन आहे. हा खरे तर समाजाचाच पराभव आहे.

इतिहासातल्या अनेक ताणतणावांतूनही उद्भवलेला हा प्रश्न आहे. मुस्लिम कट्टरपंथीयांनी सतत एकूण मुस्लीम समाजाला आधुनिकीकरणापासून, विकासप्रक्रियेपासून दूर ठेवले आहे. शिक्षणाचा अभाव आणि दारिद्र्य हे या समाजाचे मुख्य प्रश्न. त्यातूनच कट्टरपंथीय होण्याला अवसर मिळतो. हिंदू धर्मावर एकोणिसाव्या शतकापासूनच अंतर्गत टीका होत राहिली, सुधारणेची चळवळ झाली, पुन्हा पुन्हा होत राहिली. भारतीय मुस्लीम मात्र अशा कुठल्याही टीकेला अथवा सुधारणांना खुले झाले नाहीत. स्वातंत्र्य आंदोलनात राष्ट्रीय मुख्य प्रवाहाशी समरस होण्याची प्रक्रियाही सुरू झाली होती. गांधीजी त्यासाठी झटतही होते, परंतु जीनांच्या स्वतंत्र पाकिस्तानच्या मागणीने सामान्य मुस्लीम गोंधळात पडले. धार्मिकता, अल्पसंख्य म्हणून निर्माण केली गेलेली असुरक्षितेची भावना त्यांच्यात इतकी प्रबळ होती की पाकिस्तानात न गेलेला मुसलमान कायम भयगंड बाळगून इथे राहिला. त्याच आधारावर मुस्लीम

नेत्यांनी, मुल्ला-मौलवींनी धार्मिकता, कट्टरता वाढवली. मदरशांतून केवळ धार्मिक शिक्षण दिले गेले. फाळणीमुळे निर्माण झालेली हिंदू-मुस्लीमांतील कटुता वाढतच राहिली. या कटुतेला जाणून त्याला संवेदनशीलतेने दूर करणारे नेतृत्वच स्वातंत्र्योत्तर काळात मुस्लिम समाजाला लाभले नाही. हमीद दलवाईंसारख्या मुस्लीम धर्मसुधारकाला, धर्मसुधारणेची मोठी परंपरा लाभलेल्या महाराष्ट्रात मात्र मुस्लीम धर्मियांनी समजून घेतले नाही, ही शोकांतिकाच आहे. भयगंडातून आलेली आक्रमकता मात्र वाढतच राहिली आणि काश्मीर प्रश्न, बॉम्बस्फोटांचे सत्र, ११ सप्टेंबरचा अमेरिकेवरील हल्ला या घटनांनंतर सर्वसाधारण मुस्लिमांचा संबंधही दहशतवादाशी जोडला गेला. असा अपप्रचार चालवला जात असताना समाजाचाही त्यावर चटकन विश्वास बसतो. हा मुद्दा राष्ट्रवादाशी जोडता येतो आणि हिंदुत्ववादाला आयतीच पुष्टी मिळते. सरकार आणि मुस्लिम कट्टरपंथीय यांचे आजतागायतचे बेजबाबदार वर्तन याला कारणीभूत आहे, आणि यात सर्वाधिक नुकसानही मुस्लिम समाजाचेच होते आहे. धर्मनिरपेक्षतेसमोरील तेही एक आव्हान आहे.

जगभरात आज सर्वत्र मुस्लिम कट्टरतावादाने दहशतवादाचे रूप धारण केले आहे. व्यापक अर्थकारण आणि राजकारण हेच त्यामागील महत्त्वाचे कारण दिसते. आर्थिकदृष्ट्या सदैव दिवाळखोरीच्या वाटेवर राहिलेल्या पाकिस्तानने या दहशतवादाला खतपाणी घातले, हेही खरेच. काश्मीर प्रश्नात तर सदैवच पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा जगासमोर आला आहे. कट्टर आणि दरिद्री असलेल्या भारतीय मुस्लिमांत शिरकाव करून त्यांना चिथावण्याचे काम पाकिस्तानने केलेच नाही, असे म्हणता येत नाही. तेव्हा या प्रश्नाला किती धागेदोरे आहेत, ते स्पष्ट होते. हिंदुत्ववादाला समाजाचा पाठिंबा मिळण्याने पाकिस्तानचेही फावते—'बघा, तुमच्या देशात मुस्लिमांना धोका आहे' असे चित्र उभे करता येते. भारतीय मुस्लीम दहशतवादी शक्तींचे बाहुले बनून जातात. समाज आणि सरकारांची भूमिका याबाबतीत महत्त्वाची ठरते, ती याहीमुळे. दहशतवादी हा फक्त दहशतवादी असतो, त्याला कोणता जात-धर्म-देश नसतो, हे विधान तितकेसे खरे नाही. त्यामुळे 'इस्लामी दहशतवाद' ही संज्ञाही मोडीत काढता येणार नाही. इस्लामच्या नावाखाली दहशतवादाचे थैमान जगातल्या अनेक देशांतून चालू आहे. या सर्वाला तिथे ख्रिश्चन विरुद्ध इस्लाम असा प्रदीर्घ इतिहासही आहे. अरब देशांमध्ये जिथे इस्लामचे प्राबल्य आहे. तिथे उपलब्ध तेलसाठ्यांवर—जगातील नैसर्गिक स्त्रोत झपाट्याने आटत असताना—अमेरिकेसारख्या वर्चस्ववादी देशांचा डोळा आहे. तेव्हा अर्थकारण

व साम्राज्यवादी जागतिक धोरण यांतून इस्लाम विरुद्ध पाश्चात्य जग असाही संघर्ष विणला गेला. कधी फुटिरांना मदत करत, धर्मांधता वाढवत अमेरिकादी देशांनी स्वत:चे हित साधले. तर या शक्ती डोईजड होऊ लागल्यावर सरळ युद्धे लादली. यातून कट्टरपंथीयांचेच नव्हे तर सामान्य जनमतही अमेरिकाविरोधी बनत गेले. यात फावले ते इस्लामी कट्टरपंथीयांचेच. पॅलेस्टाईन, चेचेन्या आदी संघर्षांना कितीतरी वेगवेगळे संदर्भ आहेत. त्याला मुस्लीम दहशतवादाचे रूप देण्यात पाश्चात्य देशही जबाबदार आहेत. अकरा सप्टेंबरनंतर तर दहशतवाद म्हणजे फक्त इस्लाम असे चुकीचे, एकांगी चित्र उभे केले गेले. सर्व माध्यमांतून तसे ठसवले गेले. यातून भारतीय मुस्लिमांची परिस्थिती तर अधिकच बिकट झाली आहे. पण याचे भान आपल्याकडच्या धर्मांध मुस्लिम नेत्यांनाही दिसत नाही, ना सरकारांना. अशिक्षित-अर्धशिक्षित-बेकार मुस्लिम तरुण धर्मांध नेत्यांच्या आवाहनाला सहज बळी पडतात. त्यातून मुंब्रा-पडघा (जि.ठाणे) उभे राहतात. हिंदुत्ववाद्यांनाही मग आयतेच कोलीत मिळते. दहशतवादाचा प्रश्न हा फक्त धार्मिक रंगाचा प्रश्न नाही, हे आपल्याला कधी कळणार?

परभणीला मुस्लिमांची संख्या खूप नसली तरी जाणवण्याइतपत नक्कीच आहे. मराठवाडा हे एकेकाळचे निजाम स्टेट. निजाम राजवटीत मुस्लिम संस्कृती येथील बहुतेक मोठ्या शहरांतून रुजली. इथल्या मुस्लिमांमध्ये निजामी झाक दिसते ती केवळ भाषेपुरती. हैद्राबादी उर्दूचा प्रभाव केवळ मुस्लिमांवर व हिंदीवरच नाही तर इथल्या मराठीवरही दाखवता येतो. बाकी निजामी वैभव मुस्लिमांच्या जगण्यात शोधूनही सापडत नाही. दारिद्र्य, शिक्षणाचा अभाव, पारंपरिक धर्मचौकटीच्या बाहेर पडता न येणे यांतून त्यांचे जीवन अधिकच दयनीय झाले आहे. परभणीला आम्ही पूर्वी जिथे राहायचो तो सगळा तसा बकाल परिसर होता. तिथेच मला मुस्लिम शेजार मिळाला. शेव-चिवडा-भजी-चहाचे किरकोळ टपरीवजा हॉटेल हेच काय ते शेजारच्या नज़ीरचे साम्राज्य. नज़ीर माझ्यापेक्षा वयाने थोडा मोठा. पण एकमेकांच्या घरी जाण्याइतपत आणि खिर-कुर्मा-पुरणपोळ्यांची देवाणघेवाण होण्याइतपत आमची मैत्री होती. पानाचा तोबरा सदैव तोंडात ठेवून गल्ल्यावर बसलेले हमीदभाई, माझ्याच वयाची खेळातली मैत्रीण सायरा आणि तिचा भाऊ युनुस, केळी विकणारे चाचा, इंजिनिअर नावाचे सुमारे ३०-३५ जणांचे भले मोठे कुटुंब ...एवढ्याच काय त्या माझ्या मुस्लिम शेजाराच्या आठवणी. आता तर तपशीलही पुसट झाले आहेत. शाळेतला ज़मील हा एकमेव वर्गमित्र.

पण माझ्या मनावर सर्वाधिक ताजी आठवण आहे ती आमच्या कॉलेजात शिकवणाऱ्या प्रा. शेख शफी सरांची.

शफी सर आम्हाला बी.ए.ला मराठी शिकवायचे. महाराष्ट्रातली समन्वयाची परंपरा माहिती नसण्याच्या त्या वयात मला एक मुस्लिम माणूस आपल्याला आपल्या संतपरंपरा शिकवतो आहे, याचे कोण आश्चर्य वाटायचे! शफी सर शिकवायचे देखील खूप सुंदर. विवेचनाच्या ओघात एकदा सुफी संप्रदायाचा उल्लेख आला. सरांचा स्वर जरा जडावला, ते म्हणाले, "...माझंच बघा ना. मी कुणीच नाही लोकांच्या दृष्टीने. हिंदू मला मुसलमान समजतात आणि हिंदूमध्ये मिसळतो, त्यांच्यासारखंच वागतो-बोलतो म्हणून मुसलमान मला काफीर मानतात. दोघांनाही मी त्यांचा वाटत नाही." सरांनी मग चटकन विषयच बदलला. मी त्या काळात हिंदुत्ववादाने भारावलेलो असल्याने माझ्या दृष्टीने उत्तर सोपं होतं : 'जे जे अन्यधर्मीय हिंदू परंपरेचा आदर करतात, या भूमीला मातृभूमी, पुण्यभूमी मानतात, ते ते आपलेच.'

मला आता कळते, माझ्या सरांविषयीच्या आदराला किती कोते परिमाण होते ते! निखळ व्यक्ती म्हणून मीही त्यांच्याकडे पाहत नव्हतो. मग इतरेजनांची काय कथा? बहुतांश हिंदूंची, मग ते अडाणी असोत की सुशिक्षित, मुस्लिमांकडे बघण्याची दृष्टी साधारणपणे अशीच दूषित असल्याचा प्रत्यय येतो.

❑

मी इतिहास किंवा वर्तमानाचा अभ्यासक नाही. तेव्हा त्यातून निष्कर्ष काढण्याची घाई किंवा आक्रमकता दोन्हीही माझ्याकडे नाही. पण एक व्यक्ती म्हणून समाजात घडणाऱ्या घटना मला अस्वस्थ करतात. माझा निकटचा भोवताल हा हिंदुत्ववादाने भारलेला आहे आणि म्हणून स्वाभाविकपणे माझी पहिली प्रतिक्रिया त्यालाच असणार. हिंदुत्ववादी उन्मादाचा एकेकाळी मीही वाहक होतोच की!

*हिंदुन की हिंदुवाई देखी*
*तुरकन की तुरकाई।*
*कहै कबीर, सुनो भाई साधो,*
*कौन राह हवै जाई ॥*

- कबीर

❑

खरंच, धर्म इतका महत्त्वाचा असतो का?—हा प्रश्न माझ्या मनात कसा, कधी निर्माण झाला माहीत नाही, पण निर्माण झाला आणि मग चांगलाच डाचू लागला. धर्म म्हणजे काय? धर्माचे स्वरूप काय असते? सगळ्या धर्मांत साम्य काय आणि भेद काय? धर्म शाश्वत असतो की बदलता? एकूण मानवी व्यवहारात धर्माचे स्थान काय? काय असले पाहिजे? ...असे असंख्य प्रश्न होते. एके काळी कीर्तन करीत असल्यामुळे तर पुराणकथा, परिभाषा बऱ्यापैकी परिचयाच्या होत्या, पण मी करत होतो ती पोपटपंची होती. तिथे उत्तरे नव्हती. प्रश्नच होते.

वयाच्या बाराव्या-तेराव्या वर्षी मी गणपती स्तोत्र लिहिले. कीर्तने करू लागलो. त्याही वेळेस प्रश्न होतेच. मला आठवते, ज्ञानेश्वरी देखण्या स्वरूपात छापायचीच अशी टूम काढून बाबामहाराज सातारकर गावोगावी जाऊन प्रवचन-कीर्तनांतून पैसा गोळा करत होते. त्या दौऱ्यात ते एकदा परभणीला आले. मी ज्या शाळेत होतो, त्या शाळेच्या मुख्याध्यापकांकडे त्यांचा मुक्काम होता. तोवर मी बऱ्यापैकी कीर्तनकार म्हणून ओळखला जाऊ लागलो होतो. तेव्हा (विद्यार्थी म्हणून कौतुकाचा भागही असेल) मुख्याध्यापिका जोशीबाई यांनी मला आवर्जून घरी बोलावून घेतले. काही मोजकीच मंडळी जमली होती. बाबामहाराज मधाळ बोलत होते. वातावरण भारावलेले होते. अनौपचारिक गप्पा होत्या त्या. पण महाराजच जास्त बोलत होते. माझ्या मनात एक प्रश्न होता. विचारावा की नको? मी मनोमन अस्वस्थ झालो. मग संधी साधून विचारलेच, "महाराज, सगळं काही ईश्वराच्या सत्तेने चालतं असं आपण म्हणतो. झाडाचं पानसुद्धा हलत नाही त्याच्या संमतीशिवाय. मग माणसं वाईट का वागतात? खून-दरोडे-चोऱ्या का होतात?" लहान मुलाच्या बालीश प्रश्नाला उडवून लावावे, असे एक धोरणी स्मित त्यांनी दिले. मग पूर्वजन्म, पाप-पुण्य... असे काहीबाही सांगून, उत्तर संपल्यासारखे केले. लोक भारावले होतेच; आणि मी मनात 'पण' घेऊन तसाच परत फिरलो.

❑

भगवान गौतम बुद्धांना एकदा त्यांच्या एका शिष्याने प्रश्न केला, "सगळे धर्मशास्त्री धर्मचर्चा करतात तेव्हा, ईश्वराचे स्वरूप कसे आहे? ईश्वर एक की दोन? माया आणि ब्रह्म यांचे परस्परांशी नाते काय?... या आणि अशा विषयांवर बोलतात. धर्मशास्त्रातील ते महत्त्वाचे तात्त्विक प्रश्न आहेत. असे असताना तुम्ही मात्र त्याबद्दल अवाक्षरही काढत नाहीत, असे का?" बुद्धांनी त्यावर दिलेले उत्तर लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणाले, "असं बघ की

समजा तू निबीड अरण्यातून जात आहेस आणि मार्गक्रमण करताना तुझ्या पायात कुण्या झुडुपाचा काटा मोडला. त्यामुळे तुला चालणे अशक्य झाले. वेदना वाढली तर तुझी प्राथमिकता काय असेल? तो काटा कोणत्या झुडुपाचा होता? त्याचा आकार कसा होता? तो कधी निर्माण झाला? तो पायात कसा काय मोडला? या गोष्टींची चिकित्सा करणे की तो काटा काढून पायाच्या वेदना कमी करणे? मानवी जीवन दु:खाने व्यापले आहे. तेव्हा माझी प्राथमिकता आहे ते दु:ख दूर करणे ही, अप्रस्तुत तत्त्वचर्चा करणे नव्हे.''

या प्रसंगातून धर्माचा आशय अधिक नेमकेपणाने व्यक्त झाला आहे. धर्माचे हे सामाजिक परिमाण आपण जणू व्यवहारातून हद्दपारच केले आहे.

दु:खाचा अभाव म्हणजे सुख नव्हे आणि केवळ भौतिक स्वास्थ्य लाभल्याने सुख मिळते, असेही नाही. मनाच्या पातळीवरही अनेक गरजा असतात. मानवी नाती, कला यांतून आपण त्या पूर्ण करतो. तर बुद्धीच्या गरजांतूनच विज्ञान आणि शास्त्रे जन्म घेतात, विकसित होतात. तेव्हा शरीर-मन आणि बुद्धी या तिहिंच्या उचित प्रेरणापूर्तीतच हे सुख असते. सुखाची ही कल्पना व्यक्तिगत तशीच सामाजिक पातळीवरही लक्षात घ्यायला हवी. आपल्या सुखाच्या पूर्तीपायी आपण इतरांच्या, अनेकांच्या सुखावर आक्रमण तर करीत नाही ना?—या व अशा प्रश्नांना विवेकानेच सोडवायला हवे. याच ठिकाणी मूल्यांचा प्रश्न येतो. सुख हे सर्वोच्च आणि एकमेव मूल्य नव्हे. सौहार्द आणि परस्पर सहभाव हेच सामाजिक दृष्ट्या सर्वोच्च मूल्य असायला हवे. पण व्यक्तिगत, गटविशिष्ट सुखाचा कल हा अनेकदा विवेकाला न जुमानण्याकडेच असतो. तेव्हा मानवी वृत्ती-प्रवृत्तींना वळण लावणारी एक संस्था म्हणून अजूनही धर्मव्यवस्थेकडे बघता येईल. पण हे व्यापक भान कुठल्याच धर्ममार्तंडांना दिसत नाही. मग देव, परमेश्वर, मोक्ष, कर्मकांड, कुठला धर्म श्रेष्ठ... यांसारख्या निरर्थक विषयांतच धर्मचर्चा भरकटताना दिसते. केवळ मनोबुद्धी नव्हे, तर विवेकाचे अधिष्ठान असणारा धर्मच आज अस्तित्वात नाही. शेवटी धर्म हे साधन आहे, साध्य नव्हे. हाही विवेक हवाच. पण नेमका त्याचाच अभाव असलेला धर्म मग असला काय अन् नसला काय? एकच. आपला आशयच गमावून बसलेल्या मृतप्राय झालेल्या धर्मव्यवस्थेची जागा घेणारा कुठलाच संस्थात्मक पर्याय आजघडीला नाही. अन्य सामाजिक विचारसरणीही समकालीन संदर्भात आपली प्रस्तुतता हरवत चालल्या आहेत. भौतिकवादाने, चंगळवादाने समाजाला ग्रासले आहे आणि अनेक अभावांनी ग्रस्त लोक मन:स्वास्थ्य हरवल्याने नव्याने निर्माण झालेल्या

बुवा-बापू-मातांच्या नादी लागत आहेत. नैराश्याने ग्रासलेल्या, भांबावलेल्या या लोकांना गुंगवून ठेवणे एवढ्या एकाच भांडवलावर या लोकांचे मठ चालत आहेत. या सर्वांना संस्थात्मक पर्याय असणारे कुठलेच विवेकी उत्तर आपल्याकडे नाही. वैचारिक विश्वासमोरचे ते एक मोठेच आव्हान आहे.

❑

अयोध्येहून परतलो तेव्हा हे प्रश्न अधिकच तीव्रतेने जाणवू लागले. मी हे सगळे कृत्य जे धर्मासाठी म्हणून केले, ते खरोखरच 'धार्मिक', धर्मसंबंधित होते का? माझे मन मला, होकार देईना. परभणीतच होतो तोवर कुणाशीच बोलण्याची सोय राहिली नव्हती, इतका तोवर मी फक्त संघपरिवार आणि केवळ त्यालाच पाठिंबा देणाऱ्या समाजात फिरलो होतो. एक मित्र होता—अविनाश साळापुरीकर. पण तो कवितेच्या प्रांतातला. त्याचा शब्द न् शब्द मला मोलाचा वाटायचा, आजही वाटतो. त्याच्यासमोर माझी घुसमट व्यक्त करण्याचा प्रयत्न करू लागलो. मनात असंख्य गोंधळ होते. प्रश्नही धड मांडता येईना. 'मी करतोय ते चुकीचं आहे की बरोबर?' एवढाच खरे तर प्रश्न होता. अविनाश बरेचदा स्वत:तच गढून गेलेला असायचा. तो महात्मा फुल्यांविषयी बोलायचा. चांगल्या कवितेबद्दल बोलायचा. 'तू चांगलं लिहू शकतोस, लिही', असं सुचवायचा. थेट, मला हवे तसे, दोनच अक्षरे, 'नाही' (काम करू नकोस) असे मात्र कुणीच सुचवत नव्हते. आता वाटते, अविनाश माझ्याच प्रश्नांना अप्रत्यक्ष उत्तर देत होता की काय? संघ ही माझी तोवरच्या जगण्याची प्रेरणा बनून गेली होती. अविनाश बहुधा माझ्यातल्या लेखकाला, कवीला आवाहन करून माझे प्रेरणांतर करू पाहत होता की काय? मग तो थेट का बोलला नाही? घुसमट तरी कमी झाली असती. किंवा असे असेल काय, अविनाश माझी आतली घुसमट मुद्दाम वाढू देत होता, मला जोपर्यंत आतून जाणवणार नाही की हे चूक आहे आणि थांबवले पाहिजे, तोवर ते मी थांबवणार नाही. कुणाच्या चार-दोन वेळाच्या समजावण्याने कुणी अमुलाग्र बदलत नाही. अविनाश त्याची तर वाट पाहात नव्हता?

बहुधा तसेच घडायचे होते.

❑

१० डिसेंबर १९९२ रोजी संघावर बंदी आली. ती काही महिनेच टिकली. पण दरम्यान मग आपोआपच माझे संघाचे प्रत्यक्ष काम थांबले. परभणीच्या

'केशव प्रेरणा' या संघ कार्यालयाला कुलूप लागले आणि त्यावेळचे संघाचे जिल्हा प्रचारक विनयजी करमरकर काही काळ आमच्याकडेच मुक्कामी आले. नावाप्रमाणेच अत्यंत विनयी माणूस. मागील काही वर्षांतल्या कामात त्यांच्याशी माझा सतत संबंध आला होता. मिश्कील बोलणे, अथक मेहनती, विलक्षण हुशार, उत्तम संघटक, मन जिंकणारा माणूस. त्यांचा प्रभाव त्याही काळात आणि पुढे संघ सोडल्यावरही माझ्यावर राहिला, पण तोवर फक्त मी घुसमटत होतो. संघ सोडला नव्हता.

संघावरच्या बंदीमुळे काही काळ तरी कामांना प्रचंडच मर्यादा आली होती. त्यामुळे विनयजींचा प्रवास अगदीच कमी झाला होता. ते माझ्या घरीच असल्याने माझे सतत त्यांच्याशी बोलणे होऊ लागले. त्यांना भेटण्याच्या निमित्ताने संघाचे इतर पदाधिकारीही घरी येत, पण विनयजींइतका स्नेह आणि वैचारिक नाळ माझी इतर कुणाशीही जुळली नाही. त्याच काळात लक्षात आले, विनयजी वाणिज्य पदवी घेऊन पुण्यातून संघाचे प्रचारक म्हणून बाहेर पडले त्याला आता ६ वर्षे झाली होती. त्यांनी ठरावीक काळ पूर्णवेळ काम करायचे मान्य केले होते, ते त्यांचे पूर्ण झाले होते. आता तेही काम थांबवून पुण्याला परतण्याची संघ अधिकाऱ्यांकडे परवानगी मागत होते. मला संघापासून थोडे आणखी दूर जायला हेही एक कारण घडले.

अशाच प्रश्नांसह दीड वर्ष काढले आणि मग पदव्युत्तर शिक्षणासाठी मुंबईतच आलो. परिचयाच्या सगळ्या संघ कार्यकर्त्यांतून आता दूर आलो होतो, पण घरात संघाचे कट्टर समर्थक असलेले वडील होते. त्यांना कसे टाळणार?

माझे वडील अरविंद देशपांडे मुंबईत व्यवसाय मार्गदर्शन अधिकारी होते. घरी आम्ही त्यांना अण्णा म्हणायचो. माझ्या जन्माच्या दोन-एक वर्षांनंतरच त्यांची पुण्याला बदली झाली आणि नंतर कायम ते पुणे-मुंबईत अथवा दौऱ्यावर राहिले. मी मात्र लहानपणापासूनच परभणीला आजीजवळ वाढलो ते थेट पदवीपर्यंत. या वीस वर्षांत वडील म्हणून ते तसे कमीच वाट्याला आले. आम्हा तिघा भावंडांतला मी मोठा. पहिला मुलगा म्हणून आणि इतरही अनेक छोट्या छोट्या गोष्टींसाठी माझे घरात सतत कौतुक व्हायचे. स्तोत्र पाठ केले, संस्कृत वाचता येते, गाणे म्हणता येते, भाषणे देतो, कविता करतो... इत्यादी. घरातून सतत प्रोत्साहनच मिळत गेले. अण्णांनी वाचण्यासाठी खूप काही आणून दिले. कीर्तन करतो म्हटल्यावर कीर्तनाचे पुस्तक सुद्धा. विज्ञान प्रदर्शनात १९८९मध्ये मी राज्यात सर्वप्रथम आलो

नि त्यानंतर राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले, तेव्हा तर अण्णांनी मला डोक्यावरच घेतले. या यशामुळे, त्याच्या वातावरणामुळे मी अकरावीला विज्ञान शाखा निवडली. बारावीला माझे मन विज्ञानात रमेना, तेव्हा 'आता पास हो, पुढल्या वर्षी हवे तर कला शाखा निवड,' इतकी मोकळीकही अण्णांनीच दिली. व्यवसाय मार्गदर्शन अधिकारीच होते ते. दूर राहूनही, मुलाच्या व्यक्तिमत्त्व वाढीसाठी जे जे काही करता येईल, ते ते सगळे काही त्यांनी केले होते. पण जेव्हा माझे संघाशी पटेना, तेव्हा मात्र अण्णा भडकले. त्यांचे मोकळेपण या बाबतीत मात्र दिसेना. आमच्यात यावरून छोटे-छोटे खटके उडायला सुरुवात झाली.

वयाच्या विसाव्या वर्षापर्यंत वडील म्हणून ते प्रत्यक्ष वाट्याला फार कमीच आले. एकविसाव्या वर्षी मीच मुंबईला त्यांच्याजवळ राहायला गेलो, तेव्हा संघावरून आमचे खटके उडू लागले. अनेक दृश्य-अदृश्य तणाव आमच्यात निर्माण झाले.

अण्णांनी तोवरची आपली सगळी हयात संघाच्या विचारसरणीत घालवली होती. राज्यातील संघाच्या सगळ्या बड्या नेत्यांशी त्यांचा चांगलाच परिचय होता. अण्णांना दौरे खूप, त्यामुळे अनेक गावांमधले इतर छोटे-मोठे कार्यकर्तेही माहीत असायचे. प्रचंड लोकसंपर्क आणि शब्द दिल्यावर त्यांच्यासाठी काहीही करण्याची अण्णांची तयारी असायची. सगळ्या कामांत इतकी शिस्त की इतरांना त्यांचा धाकच वाटावा. स्वत:च्या जीवावर, धडपडत अण्णांनी आपले जग घडवले, वाढवले होते. त्यातच 'संघवाला' या त्यांच्या परिचयाची भर पडली आणि तो परिचय त्यांनी आजतागायत अभिमानाने मिरवला.

मी मुंबईत पदव्युत्तर शिक्षणासाठी आलो. मुंबई विद्यापीठातून एम. ए. मराठी करायला लागलो. ते वर्ष होते १९९४. आता इथे मला सगळे नवीनच विश्व खुले झाले होते. संघापासून वैचारिक दृष्ट्या दूर जात होतोच आणि आता मुंबईत येण्याने परभणीतले माझे संघाचे जगही दूर गेले होते. बांद्र्याच्या सरकारी वसाहतीत आम्ही राहायचो, तिथली सायंशाखा (संध्याकाळी भरणारी संघाची शाखा) त्या काळात काहीशी अनियमित झाली होती. प्रभातशाखा मात्र अखंड चालू होती. त्यात वडील नित्यनेमाने जायचे. माझी एम. ए.ची लेक्चर्स सकाळची असल्याने माझे प्रभातशाखेत जाणेही आपोआपच टळू लागले. तोवर अण्णांपर्यंत माझे 'संघापासून दुरावत जाणे' पोचलेलेच नव्हते.

मग कधी तरी संघाच्या उत्सवाची मला आमंत्रणे येऊ लागली. माझे म्हणणे अण्णांपर्यंत पोचवण्याचे धाडस माझ्यात नव्हते. एक-दोन उत्सवांना गेलो. केवळ भिडेखातर. मग एकदा तर मला वक्ता म्हणूनच आमंत्रित केले गेले. आता मला स्पष्ट भूमिका घेण्याची गरज जाणवू लागली. अण्णा घरात नव्हते. आलेल्या कार्यकर्त्यांना मी शक्य तितक्या सौम्य शब्दांत सांगितले, "हे बघा, गेल्या काही वर्षांत मी संघाच्या विचारात रमत नाहीय. कुठेतरी खटकतंय. अशा स्थितीत मी तुमच्या उत्सवाला वक्ता म्हणून येणं बरं होणार नाही. तेव्हा कृपया मला माफ करा." त्यांचेही अडले असावे, नियोजित वक्त्याचे रद्द झाले होते. उत्सव दोन दिवसांवर आल्याने त्यांनी मला गळ घातली होती. अण्णा सतत दौऱ्यावर असतात, हे त्यांना माहिती असल्याने, त्यांनी ते गृहीत धरूनच, त्यांच्याऐवजी मलाच विचारले होते. "ठीकय, जे पटतंय, ते तर बोलशील: आपली भारतीय परंपरा..." ते प्रयत्न सोडेनात. शेवटी मी स्पष्टच सांगितले, "मी जर आलो तर मी संघाच्या विचारसरणीच्या विरोधात बोलीन. तुम्हाला चालेल का? याच अटीवर मी येईन." मी इतका मोठा नव्हतो की त्यांनी माझे खपवून घ्यावे. ते निघून गेले.

कधीतरी हे अण्णांपर्यंत पोचलेच असणार. मी अण्णांच्या संभाव्य प्रतिक्रियेने मनोमन धास्तावलो होतो. अण्णांना काय वाटेल? ते काय प्रतिक्रिया देतील माझ्या या वागण्यावर? काही दिवस गेले तरी अण्णांकडून काहीच प्रतिक्रिया आली नाही. एकदा रात्री जेवायला बसलो असताना "मला म्हणाले, "एक छोटासा जॉब आहे. करणार का?" मी म्हटले, "करीन की." लेक्चर्स सकाळची असल्याने दिवस तसा मोकळाच होता. "साप्ताहिक विवेकमध्ये त्यांना एकजण हवाय. डेस्क जॉब आहे. पत्ता देतो. उद्या रमेश पतंगेंना भेटून ये." म्हटले, "ठीकय. जातो उद्या." मग म्हणाले, "तिथे चांगली लायब्ररी आहे. स्वामी विवेकानंद, सावरकर, गुरुजी, दीनदयाळ उपाध्याय यांचे खंड आहेत. तेही वाच. म्हणजे संघाबद्दलची सगळी उत्तरं तुला मिळतील." म्हणजे अण्णांना माहिती होते तर! पण त्यांनी या गोष्टीला असे वळण दिले होते. दरम्यान आजीला कॅन्सर झाला होता. तिचा इलाज चालू होता. परभणीला घरी पैसे पाठवणे, मुंबईतले खर्च भागवणे, आमची शिक्षणे, छोट्या भावाला जबर फीस भरून हॉटेल मॅनेजमेंटला घातले होते, थोडे कर्ज, थोडी उसनवारी अण्णांना करावी लागली होती. त्यांची ही सगळी ओढग्रस्तता दिसतच होती. नोकरी करणे भाग होते. मुंबईला मी अजून सरावलो नव्हतो. ओळखी नव्हत्या. 'ही नको, दुसरी करतो' असे अण्णांना सांगण्याचे

धाडसही माझ्याकडे नव्हते. मी मुकाटपणे साप्ताहिक विवेकमध्ये नोकरी धरली.

'साप्ताहिक विवेक' हे संघाचे मुखपत्र. त्यातले लेखही स्वाभाविकपणे फक्त संघ विचारसरणीला वाहिलेले. इकडे तिकडे जायला वावच नव्हता. पुन्हा घुसमट सुरू झाली. विवेकच्या लायब्ररीतली पुस्तके होती. तीही वाचत होतो, पण मनातले गोंधळ अधिकच वाढत होते. खरे काय, खोटे काय? निर्णय करण्याची क्षमताही त्या वयात विकसित झालेली नसते. काहीतरी, कुठेतरी पटत नाहीय, एवढेच कळत होते. काय ते मात्र कळेना. कुणाशी बोलणार? एम.ए.चे मित्र सगळे वाङ्मयीन क्षेत्रातले. जिल्ह्याच्या ठिकाणाहून मुंबईला आल्याने मी नव्याने ओळखी झालेल्या समवयस्क मित्रांशी खूप बुजरेपणानेच वागायचो. बरेच न्यूनगंड होते. शिवाय बोलणे व्हायचे तेही बरेचसे साहित्यावरच. तोवर मी परभणीत एक कवी म्हणून बऱ्यापैकी ओळखला जाऊ लागलो होतो. प्रेमकविता, निसर्गकविता, हळव्या हळव्या सामाजिक कविता मी भरपूर लिहिल्या होत्या. अविनाश साळापुरीकर हा परभणीचाच एक कविमित्र. त्याने माझ्या हातात त्यावेळी नेमाडे, चित्रे, कोलटकर, ओक.. असे अगदीच वेगळ्या पठडीतले कवी ठेवले. माझे मौन पाहून मग त्यानेच त्यांच्याविषयी बोलायला सुरुवात केली. मुंबईत येईतोवर त्याने माझी वाङ्मयीन भूमी मात्र नक्की तयार केली होती. मुंबईत मन्या जोशी, नितीन रिंढे हे मित्र बनले. पुढे आणि आजतागायत आमचे चांगलेच त्रिकूट बनले. हाच सगळा काळ माझ्या वाङ्मयीन परिवर्तनाचाही होता. त्यातच भाऊ पाध्येंचा जावई भेटला नि मग भाऊंशीही भेटी व्हायला लागल्या. मीही मग खूप वेगवेगळे काय काय वाचू लागलो. पण यातच अशा घुसमटींनी संभ्रम वाढतच चालला.

मन्या उत्तम कविता लिहायचा. नितीननेही खूप तिरपागडे काय काय वाचले होते. इथे कळले की साहित्यातल्या माणसाने इतरही क्षेत्रातले आवर्जून वाचले पाहिजे. विद्यापीठातल्या नेहरू लायब्ररीने मोठे दालनच खुले केले. वेळ मिळेल तेव्हा, तसा मी भरपूर वाचू लागलो. हे मित्रही मग, एकमेकांच्या घरी नेहमी जाण्या-येण्याइतके आणि दररोज फोन करण्याइतके घनिष्ट बनले आणि माझी कोंडी फुटू लागली. वाचनावर चर्चा होऊ लागली. भोवतालावर चर्चा होऊ लागली. यातूनच मी स्वत:ला पारखत होतो. इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राजकारण... केवढे तरी विषय मला खुणावू लागले. त्यांच्यातले संबंध जाणवू लागले. भाषा आणि साहित्य हे तर होतेच.

वैदिक संस्कृतीचा विकास, भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास, पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा इतिहास, चार्वाक दर्शन, बौद्ध दर्शन, आंबेडकर, म. फुले, गांधीजी, सावरकर, आगरकर, विवेकानंद, मार्क्स, बुद्धिवाद, वैज्ञानिक तत्त्वज्ञानाचा उदय, धर्म... एम.ए.च्या त्या दोन वर्षांत झपाटून मी खूप वाचत होतो.

भारतीय परंपरेत एक अवैदिक म्हणूनही काही परंपरा आहे, हे इतक्या स्पष्टपणे मला त्याच काळात कळले. मी इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्मियांचे खूप काही वाचले नाही. अजूनही नाही. मला माझ्याच भारतीय परंपरेत चार्वाक आणि बौद्ध दर्शनांमध्ये ती उत्तरे सापडतायत असे वाटले आणि भारावूनच गेलो. बुद्धाने केलेले मानवी दु:खाचे विश्लेषण, चार्वाकांनी पूर्वपरंपरेवर घेतलेले आक्षेप आणि प्रतिपादन केलेला जडवाद मला खुणावू लागला. त्यातून प्रश्नही जन्मत होतेच. ती काही निर्णायक उत्तरे नव्हती. पण देव, धर्म आणि जगण्यातील त्याचे स्थान याविषयी काही एक भूमिका घेण्यास ही दोन्ही तत्त्वज्ञाने मला उपयोगी पडली. चार्वाक आणि बुद्ध यांच्यात उघडच अनेक फरक आहेत, पण त्याहीपलीकडे जाऊन त्यांची धर्मविषयक भूमिका, ईश्वरविषयक भूमिका मला पटू शकत होती.

आणि एकदा रेडिमेड उत्तरांना सपशेल नाकारणारे जे. कृष्णमूर्तीच हातात आले. 'विचारसरणीच नाकारा' म्हणणारे, त्यातले धोके इतके स्पष्टपणे दाखवणारे. कृष्णमूर्ती पचवणे महाकठीण होते. पण ते थेट माझ्यातल्या दोषांवर, विसंगतींवर बोट ठेवणारे होते. बुद्ध-चार्वाक आणि कृष्णमूर्ती— माझ्यापुरते, माझ्या आत एक अजब रसायन तयार होऊ लागले. जे प्रश्न मला पडलेही नव्हते, त्यांच्या उत्तरांपासून मला माझ्या उत्तरांची दिशा खुली होऊ लागली.

निर्णायक अंतिम उत्तरे असतच नाहीत. विशेषत: जे प्रश्न मानवसंबंधित असतील, त्यांची. एक म्हणजे कुणीच सर्वज्ञ नसतो. असू शकत नाही. दुसरे, एका प्रश्नातून निघणारे उपप्रश्न, परत त्याचे उप-उपप्रश्न.. हे प्रश्नांचे जाळेही पुरते आपल्या आवाक्यात येत नाही. तेही असतातच. त्यामुळे एक विधान, एक रेडिमेड उत्तर, इतर अनेक विधाने, अनेक उत्तरांवर अथवा प्रश्नांच्या पायावर उभे असते.

खरा प्रश्न तुमच्या जगण्याचा असतो. सर्वांच्या जगण्याचा. जगणे सुंदर झाले पाहिजे. ते कसे होईल? त्यासाठी विचारसरणी. 'असं वागा म्हणजे छान होईल. ते-ते तर सपशेल चूक आहे, त्या वाटेलाही जाऊ नका. हे असं वागा, तसं वागू नका' असे सांगणारे अनेक पंथ. त्या पंथातल्या लोकांचे तरी जगणे सुखी झालेय का? सुखी होणे म्हणजे काय? धन, मानमरातब की आणखी काही?

मला सुख हवे असते, मी अमुक देवाची उपासना करतो. मला सुख हवे असते, मी तमुक पंथाचा अनुयायी होतो. तत्त्वत: मी सगळ्यांचे जगणे सुखी व्हावे असे म्हणतो, पण व्यवहारात मी माझ्या भल्यापलीकडे जात नाही आणि तरीही मी असमाधानीच राहतो. न संपणारे असमाधान. मग मला कुणीतरी सांगते की या जन्मात नाही, तरी पुढल्या जन्मात खात्रीने सुखी होशील. देव सोडू नकोस, पंथापासून ढळू नकोस. किंवा तुझेच काही चुकत असेल. मागील जन्मात पाप केले असशील. या जन्मात पुण्य कर.

पुण्यवान माणसांचे काय होते या जगात? पापी माणसे सदैवच कशी सत्तास्थानी राहतात? पुढील जन्मांची कुणी खात्री द्यावी? आहे त्या जन्माचे काय? मी दु:खी आहे. भोवतालचे दु:खी आहेत. दु:खबांधवच आहोत आम्ही. समान पातळीवरचे.

मी दु:खी असतो. मी चिडचिडा होतो. मी वाईट वागतो. तो दु:खी असतो. तोही चिडचिड करतो. तो माझ्या वाईट वागण्याला वाईट वागूनच प्रतिक्रिया देतो. ही साखळी संपत नाही. माझ्या चांगल्या वागण्याने समोरचाही चांगला वागेल का? चारपैकी एक नक्कीच वागेल. कदाचित दोनही. माझ्या चांगल्या वागण्याने मला एक चांगलेपण मोबदल्यात मिळतेय. तर मी चांगलेच का वागू नये? चांगले वागण्याला काय लागते? फक्त भान. सगळ्यांचे भान. बहुतांचे भान. कुणावर अन्याय होणार नाही याचे भान. मग तिथे गुरू, पंथ, देव धर्म यांची गरजच काय? माझ्या माणूस म्हणून चांगले वागण्याचा देव-धर्माशी एकास एक संबंध नाही. मग ते ओझे वागवाच कशाला? मी देवाची पूजा केली नाही; मंत्र, अभिषेक केले नाहीत; परंपरा पाळल्या नाहीत आणि फक्त माणूस म्हणून इतरांशी वागत राहिलो, तर कुणाचे बिघडते? का बिघडावे? माणूस होणे हे माझे सर्वोच्च मूल्य. माझ्या संपर्कात आलेल्या

व्यक्तीशी होता होईतो पूर्वग्रहविरहित वागणे, हाच त्याचा मार्ग. स्वत:तल्या दोषांचे, मर्यादांचे सतत भान ठेवणे हीच त्याची पद्धती.

तत्त्वत: हे सगळेच स्वप्नाळू वाटते. व्यवहारात शक्य आहे का धर्मविहीन असणे? चला वागून तर पाहू. आपोआपच धर्माचे, देवाचे, रूढींचे मनावरचे ओझे गळून पडले. मुक्त वाटले. विचारसरणी—अगदी सामाजिकसुद्धा, एकांगी कशी बनत जाते, ते पदोपदी दिसत होते भोवताली. निर्णायक उत्तरांची खात्री देणे ही गरज असते विचारसरणी अथवा संघटनांची. असू दे बापडी, मला त्याची गरज वाटत नाही.

माझ्या भोवतालचा समाज देव मानणारा असेल, विचारसरणी मानणारा असेल पण माझे त्यांच्याशी वैर असण्याचे काहीच कारण नाही. मला पटत नसेल, पण मी त्यांची श्रद्धा म्हणून ते विश्‍व मान्य करीन. त्यांनी माझे मान्य करायला हवे—ईश्‍वर नाकारण्याचे, धर्म-विचारसरणी नाकारण्याचे स्वातंत्र्य!

आजूबाजूचे अनेक संघर्ष थोपवणे माझ्या हातात नाही. मी बदलण्याने ते कमीही होत नाहीत. म्हणून मी माणूस असणेच सोडून द्यावे काय? ते टिकवणे हीच माझी सर्वोच्च कसोटी. मला ज्ञानेश्वर, तुकाराम, कबीर जवळचे वाटतात ते याचमुळे. मला तुमचा ईश्वर कळत नाही, तुकोबा, मोक्षही कळत नाही; तुमचा आंतरिक संघर्ष कळतो. तुम्ही देवाच्या निमित्ताने अंत:करण-शुद्धीची स्वत:शीच लढाई लढताय, ती कळते. 'जो जे वांछील तो ते लाहो' मधील ज्ञानेश्वरांच्या पसायदानाची आर्तता कळते. 'ढाई अक्षर प्रेम का, पढे सो पंडित होय' म्हणणाऱ्या कबीराची कणव कळते. मला मी कळतो आणि जग कळण्याची धडपडही केलीच पाहिजे मला.

धर्म अथवा विचारसरणीने किती एकांगी होईन मी, माणूस समजून घ्यायला! मला देव—धर्म—पंथ—विचारसरणीशिवाय छान जगता येतेय, काहीही बिघडलेले, अडलेले नाहीय माझे. आणि मीही कुणाचे काही बिघडवलेले नाही नाकारून. आजतागायत. तर हेच मला माझ्यापुरते सापडलेले उत्तर नाही का? होणाऱ्या, होऊ घातलेल्या चुका अथवा दोषांसहित त्याची जबाबदारी पूर्णत: माझीच आहे. सदैव!

❑

'विवेक'मधले माझे काम हळूहळू वाढत होते. अभ्यासाची चिंता नव्हती, पण अवांतर वाचनाला वेळ मिळेना. कामाच्या तुलनेत पैसेही कमी मिळायचे. कसेबसे एक वर्ष काढले नि ते काम सोडले. 'विवेक'मध्ये असेतोवर, मी संघवाल्याच्या घरातला, त्यातून द्वितीय वर्ष शिक्षित म्हणजे 'संघवाला'च असणार हे गृहीत होते, त्यामुळे माझी मानसिक—वैचारिक आंदोलने 'विवेक'मधल्या लोकांपर्यंत पोहचण्याचा प्रश्नच नव्हता. मी त्या काळात खूपच कमी बोलणारा, अंतर्मुख वाटावा असा बनलो होतो. डोके बाजूला ठेवून 'नोकरी' म्हणून काम करायचे तर काहीच त्रास होत नाही. (पण असे होत नाही.) शेवटी मी 'विवेक' सोडले.

मन्या, नितीन, मी आणि इतर मित्र, आम्ही खूप वाङ्मयीन उपद्व्याप केले या काळात. 'संवाद' नावाचे एक विद्यार्थ्यांचे अनियतकालिक चालवले. लेख लिहिले. लेखकांना भेटत राहिलो. वेगवेगळ्या कार्यक्रमांतून जात राहिलो. आमचे वाङ्मयीन जग विस्तारत होते. एम. ए. पूर्ण केले आणि लगोलग, पुन्हा अण्णांच्याच ओळखीने, दैनिक 'सांज तरुण भारत'मध्ये रुजू झालो. हा सुद्धा संघवाल्यांचा पेपर, पण इथे विवेकइतक्या मर्यादा पडल्या नाहीत. पुढे वर्षभरानंतर मुंबईतल्या एका प्रतिष्ठित महाविद्यालयात व्याख्याता म्हणून रुजू झालो, १९९७ मध्ये. मग शिकवणे, विद्यार्थी, पुन्हा अभ्यास यात पार बुडून गेलो.

मी संघाच्या शाखेत जात नाही ही अण्णांची तक्रार नव्हतीच मुळी. मी संघाच्या विचारसरणीचा आदर करत नाही, मतभेद व्यक्त करतो, हे त्यांच्यादृष्टीने चिंतेचे होते. रात्री जेवणाच्या वेळात टीव्हीवर बातम्या सुरू असायच्या. अनेक राजकीय, सामाजिक विषय असायचे. अण्णा मुद्दाम मला कुठल्याही चालू घडामोडीविषयी विचारायचे नि चर्चा फिरून संघाच्या, हिंदुत्ववादाच्या मुद्यावरच यायची. तणाव निर्माण व्हायचे. मग मी फारसे बोलणे टाळू लागलो, पण हा काही पर्याय नव्हता.

मी आता फिरून संघाच्या विचारसरणीकडे वळणे अशक्य आहे, हे स्पष्टपणे अण्णांना सांगण्याचे धाडस मी अजून गोळा करू शकलो नव्हतो. आणि माझे हळूहळू मतभेद व्यक्त करू लागणे, हा त्यांना आपण आजवर केलेल्या (संघ) संस्कारांचा पराभव वाटत होता. त्यातून ते मला चर्चेला उकसवू पाहत होते. शेवटी मी जे टाळू पाहत होतो, ते एकदा घडलेच.

ख्रिश्चन मिशनरी स्टेन्स आणि त्यांच्या दोन लहान मुलांची बजरंग दलाच्या कुणा दारासिंग नामक व्यक्तीने निर्घृण हत्या केल्याची घटना बातम्यांत, चर्चेत होती. दारासिंग हा संघ परिवाराचाच असल्याचे न्यूज चॅनल्स सांगत होते. जेवता जेवता आम्ही बातम्या बघत होतो. बातमी ऐकून अण्णांनी खाडकन टीव्ही बंद केला.

"हे, हे तुमचे सेक्युलर-डावे जर्नालिस्ट. डोळ्यांवर झापडे लावलेले. त्यांना वाटते सगळ्या घटनांना हिंदुत्ववादीच जबाबदार आहेत. तपास सुरू होण्याआधीच निर्णय करून मोकळे." हे बोलताना अण्णांच्या स्वरांतून संताप ओसंडत होता.

मी म्हटले, "पण अण्णा, या तऱ्हेने कुणा माणसाला, त्याच्या दोन मुलांना जाळणे हे क्रूरच नाही का? स्टेन्स कोण होता, दारासिंग कुठल्या विचारसरणीचा, हा नंतरचा मुद्दा."

"तुला माहितीय, ख्रिश्चन मिशनरी सेवेच्या नावाखाली कशी धर्मांतरे करतात? गरीब वनवासी बांधवांची कशी दिशाभूल करतात? अलीकडेच एका अमेरिकन लेखकाने मदर टेरेसांच्या कामाचा बुरखा फाडणारे पुस्तक लिहिलेय. मिशनरी कसे छुपे शोषण करतात हे एक हिंदुत्ववादी नाही, तर एक अमेरिकन माणूसच सांगतोय. त्यावर तरी तुम्ही विश्वास ठेवणार की नाही?"—अण्णा.

"पण मिडीया biased असू शकतो अण्णा..."

"असू शकतो नाही, असतोच. हिंदुत्ववाद्यांच्या बाबतीत तरी आहेच. हे सेक्युलर लोक कोणत्या जगात राहतात काय माहीत? इथे एका मिशनऱ्याला मारले म्हणून एवढी राष्ट्रीय बातमी करून चघळली जाते, पण काश्मिरात हिंदू पंडित मारले-जाळले गेले, विस्थापित झाले, त्याचे काय? त्यावेळेस तुमचे सेक्युलर लोक कुठे असतात? त्यावेळेस तुमचे जावेद अख्तर, शबाना आझमी कुठे असतात? एकाने तरी निषेध केलाय का या घटनांचा?"

"अण्णा, जेवढी मुस्लीम धर्मांधता वाईट, दहशतवाद वाईट तेवढाच हिंदुत्ववादही वाईट. मिशनऱ्यांनी धर्मांतरे केली तेव्हा हिंदुत्ववाद्यांना आदिवासी आठवले काय?"

"आदिवासी नाही, वनवासी! आदिवासी हा ब्रिटिशांनी बुद्धिभेदासाठी वापरलेला शब्द आहे. मेकॉलेच्या शिक्षणपद्धतीने घडवलेली पिढी आहात तुम्ही."

"भारत हे केवळ हिंदू राष्ट्र आहे, हे मी मानत नाही. घटनेनेच भारत 'धर्मनिरपेक्ष राष्ट्र' आहे."—मी.

"तुझ्या मानण्या न मानण्याने काय होतेय? अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा हिंदुत्व हा शब्द धर्माशी संबंधित नसून तो राष्ट्रीयत्वाचा पर्यायी शब्द आहे, असा निर्णय दिलाय." अण्णांना जणू वादात जिंकायचेच होते.

"अण्णा, मला वाटत नाही तुम्ही किंवा इतर हिंदुत्ववादी मांडताय तसा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय असेल. मी त्यातला तज्ज्ञही नाही. धर्मनिरपेक्ष शब्द बाजूला ठेवू, पण मानवतावाद तरी तुम्हाला मान्य आहे की नाही?" मी.

"आहे ना. आम्ही हजारो वर्षे मानवतावादच शिकवतोय जगाला. सगळे जग ज्यावेळेस पाषाणयुगातच वावरत होते, त्यावेळेस आम्ही प्रगत सांस्कृतिक अवस्थेत होतो. वेद लिहिले जात होते. जगाच्या कल्याणाचा विचार होत होता. हिंदूंनी कधीच कुणावर आक्रमण केले नाही. मुस्लिम, ख्रिश्चनांचा सगळा इतिहासच रक्तरंजित आहे. त्यांनी धर्मांतरे करायची, मंदिरे तोडायची, आम्हाला शिव्या द्यायच्या आणि आपण काय बघत राहायचे? वर आम्हाला मानवतावाद शिकवणार हेच. अतिरेकी मेले तरी हे मानवी हक्काची भाषा करणार. हिंदूंना कोण वाली आहे? हे हिंदूंचे राष्ट्र आहे, हिंदूंच्या हिताचे रक्षण इथे झालेच पाहिजे." अण्णा आता टिपिकल पुस्तकी हिंदुत्ववाद बोलू लागले होते.

मला कळत होते, आता चर्चा कुठल्या कुठे भरकटलीय. इतिहास, वर्तमान, धर्म, राजकारण, वास्तव, दृष्टिकोन अशा अनेक गुंत्यांचे हे मुद्दे आहेत. सगळ्याच गोष्टींचे माझ्याकडे उत्तर नव्हते. अण्णांकडे रेडिमेड हिंदुत्ववादी उत्तरे होती. काहीही घडले तरी बघायला एक चष्मा होता. मी संपूर्ण विचारसरणीहिन होतो अथवा आहे, असे नाही, पण तसे असावे या मताचा मी नक्की आहे. पण तरीही ही हत्याकांडे मला अस्वस्थ करीत होती. मग ती काश्मिरातील असतील, अफगाण वा इस्त्रायल-गाझापट्टीतील असतील. पाकिस्तानातील शिया-सुन्नी दंगली असतील किंवा भारतातील हिंदू-मुस्लिम तणाव असतील. निखळ धर्माचे हे मुद्दे नाहीत. त्यापलीकडचे एक व्यापक विघातक राजकारण त्यामागे आहे, हे मात्र मला जाणवत होते. त्यातले धागेदोरे माझ्या आकलनापलीकडचे असतील, पण या 'पॉवर ट्रॅप'मध्ये आपण का

अडकायचे हा माझ्यासमोरचा प्रश्न होता आणि मी सुटण्याची धडपड करीत होतो.

वाईट याचेच वाटत होते की या विचारसरणींनी माझ्यात आणि अण्णांमध्ये तणाव निर्माण केले होते. माझ्यापेक्षा त्यांना जास्त त्रास होत असणार, हेही कळत होते. या गोष्टींची किती घनिष्ट सावली होती आमच्या नात्यावर! नंतरही अशा घटना अधूनमधून घडतच राहिल्या. तोवर माझाही अभिनिवेश कमी झाला होता आणि अण्णा मला अधूनमधून उकसवू पाहत होते. ते मला हिंदुत्ववाद पटवून देऊ शकत नव्हते. घरातल्या व्यक्तीने पहिल्यांदा त्यांच्या मतांना आक्षेप घेतला होता, या अस्वस्थतेतून ते अधिकच आक्रमक व्हायचे. मी गप्प राहणेच पसंत केले. ते बदलणार नाहीत, तसाच मीही मागे फिरण्याची शक्यता नाही. मतभेद आहेत ते स्वीकारून, एकत्र राहणे हाच पर्याय असतो अशा वेळी. बाप-मुलाचे घरातलेच हे नाते असल्याने ते ताणले तरी सहजी तुटले नाही, तुटणार नाही; पण सामाजिक पातळीवर दोन गटांमध्ये, दोन समुदायांमध्ये, हिंदू-मुस्लिमांमध्ये किती गोष्टी इतिहासापासून तुटत आल्या असतील, या कल्पनेने मी थरारलो. माझ्याकडे यांपैकी कसलीच समाधानकारक उत्तरे नव्हती, नाहीत. मला फक्त मानवी नाती कळत होती, मानवता कळत होती. लोकांच्या मते, हे सगळे पुस्तकात बरे असते, व्यवहार वेगळाच असतो. अशा प्रत्येक घटनेनंतर, मी पुन:पुन्हा 'एक माणूस म्हणून, धर्म किंवा विचारसरणीशिवायही जगता येऊ शकते' या मतापर्यंत येत होतो.

आणि असा प्रवास एकाकीच असतो.

माझा एक बालमित्र आहे — विजय. पहिलीपासून बारावीपर्यंत आम्ही एकाच वर्गात शिकलो. आमच्यात छान घनिष्ट नाते होते. मी संघाचे काम पूर्वीपासूनच करायचो, तो कधीतरी उशिरा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या संपर्कात आला आणि काम करू लागला. अयोध्येला आलेल्या कारसेवकांपैकी तोही एक होता. शिक्षण, संघाची विचारसरणी याहीपलीकडे आमच्यात काही नाते होतेच. पुढे मी शिकायला मुंबईला गेलो आणि तोवर माझी संघापासून दुरावण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. माझ्या मागोमाग दोन वर्षांनी विजयही मुंबईला आला; पण शिकण्यासाठी नाही, अभाविपचा पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून. मी वांद्र्याला राहायचो आणि त्याचे कार्यालय माटुंग्याला होते. शिवाय माझ्या घरातले वातावरण, अण्णांचे एके काळी अभाविपमध्ये सक्रिय असणे,

याहीमुळे त्याचे आमच्या घरी येणे व्हायचे. मीही अवघडल्यासारखे वाटले तरी, अभाविपच्या कार्यालयात त्याला भेटायला जाऊ लागलो. तोवर मी एका महाविद्यालयात शिकवायला लागलो होतो. एकदा माझ्या अपरोक्ष, माझे नाव सांगून विद्यार्थी परिषदेचे काही कार्यकर्ते माझ्या महाविद्यालयात आले आणि त्यांनी विविध वर्गांतून पोस्टर-स्टीकर लावणे, मुलांना सदस्य करून घेणे चालवले. मला हा प्रकार दुसऱ्या दिवशी कळाला. मी भडकलोच आणि घरी आल्यावर थेट माटुंग्याच्या कार्यालयात फोन लावला. विजय दौऱ्यावर होता. फोनवरच्या कार्यकर्त्याला, माझे नाव सांगून परिषदेचे काम वर्गांतून करण्याबद्दल तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. घर संघाचे असले तरी मी संघाचा नाही, असे सुनावले. या घटनेनंतर विजय घरी आला नाही, फोनही आले नाहीत. मी फोन करूनही तो फोनवर भेटला नाही. नंतर त्याने मुंबई सोडली. पूर्णवेळ काम थांबवून संसाराला लागला. हे सगळे मला बाहेरून कळत गेले. पण तो भेटलाच नाही. विचारसरणी नात्यांना कशी कलुषित करू शकते, त्याचे हे दुसरे उदाहरण!

माझी बायको मेधाविनी नामजोशी MSW (मास्टर ऑव्ह सोशल वर्क्स) झालेली आहे. माझ्यासारखी केवळ पुस्तकी नाही. प्रत्यक्ष समाजातल्या विविध गटांसोबत काम करण्याचा तिला अनुभवही आहे. तिची आणि माझी सामाजिक मते जुळू शकणारी होती. किंबहुना आमचे लग्न ठरण्यातला तोही एक महत्त्वाचा दुवा होता. माझे सासर मात्र संघवाल्यांचेच आहे. सासरे संघाचे समर्थक आहेत. दररोजच्या शाखेपेक्षा, संघाची एकुणात विचारसरणी आणि सेवाकार्य त्यांना जवळची वाटतात. जोवर मी संघमताचा असावा असा आग्रह होत नाही, तोवर मलाही काही प्रश्न असण्याचे कारण नाही. पण असे नेहमीच होत नाही.

मी ज्या महाविद्यालयात प्राध्यापकी करतो तेही संघ विचारसरणीचेच आहे. साहित्यासारखा विषय मी शिकवतो. कोणताही सामाजिकदृष्ट्या संवेदनशील विषय मला अस्पृश्य नाही. किंबहुना साहित्यातल्या माणसाला ते अवगत असायलाच हवे. तेव्हा अशा वेळी भूमिका टाळून चालत नाही. ती घ्यावीच लागते.

एकदा मी वर्गावर असताना प्राचार्यांचे बोलावणे आले. केबिनमध्ये गेलो तेव्हा त्यांनी आमच्याच महाविद्यालयाचा सुमारे तीन महिन्यांपूर्वी प्रकाशित

झालेला वार्षिकांक माझ्या पुढ्यात ठेवला आणि त्यातल्या एका विशिष्ट पानावर बोट ठेवत म्हणाले, "हे वाचा." एका विद्यार्थिनीचा मराठी लेख होता तो. अंकाच्या मराठी विभागाचे संपादन मीच केलेले असल्याने, मला तो लेखही ठाऊक होता. मी म्हटले, "सर, हा लेख मला माहितीय. वाचलाय तो मी." प्राचार्य म्हणाले, "वाचलाय ना? मग संपादित का नाही केलास? मुले काहीही लिहितात, त्यांना काय कळते...?" लेखाचे शीर्षक होते 'बाबरी मशीद ते राममंदिर आणि भरकटलेली युवा मने.' मी म्हटले, "ठीकय सर, मतभेद असू शकतात. त्यातले मत आपल्याला मान्य होणार नाही कदाचित. पण लेखात मला काही आक्षेपार्ह वाटत नाही. त्यात काही बदल सुचवावे किंवा करावेसे वाटले नाहीत मला."

लेख कुणा एका समुदायावर टीका करणारा नव्हता. वानगीदाखल लेखातली काही वाक्ये अशी : "...कार्यकर्त्यांच्या बाबतीत म्हणायचे तर, ते हिंदू असोत किंवा मुस्लिम असोत, ते त्यांच्या स्वार्थी नेत्यांच्या हातातल्या केवळ बाहुल्या असतात. त्यांना स्वत:चा विचार नसतो. जे या संघटनांचे कार्यकर्ते किंवा समर्थक आहेत त्यांनी काही प्रश्नांची उत्तरे द्यावीत. आजची देशातील व बाहेरील परिस्थिती पाहता तुम्हाला तुमचा देश महत्त्वाचा वाटतो की तुमची मंदिर, मशीद? ... काय मिळवले तुम्ही मशीद पाडून? रामाने तुम्हाला शाबासकी दिली, की "अरे वा, तुम्ही माझी जन्मभूमी शोधून तिच्यावर रक्ताचा अभिषेक केलात!" तुम्ही कोणत्या रामासाठी एवढा उपद्व्याप करता आहात?... तुमच्या नेत्यांनी तुम्हाला आदेश दिला की तुम्ही मेंढरासारखे लगेच निघता. पण साधा विचार करत नाही की, ज्या दंगली होतात किंवा वाद होतात, त्यात तुमच्यापेक्षा तुमच्या नेत्यांचे किती नुकसान वा किती फायदा होतो?... तुमच्या गटातल्या एकाची हत्या झाली तर तुम्ही विरुद्ध गटातील दोघांची हत्या करता, मग तुमच्यात आणि त्यांच्यात काय फरक राहिला?... तरुणांना एकच आवाहन करावेसे वाटते की या नस्त्या फंदात पडण्यापेक्षा प्रथम स्वत:च्या पायावर उभे राहा. उघड्या डोळ्यांनी जगाकडे पाहा..."

मी म्हटले, "सर, या लेखात मला तत्त्वत: काही चूक वाटत नाही.."

"काहीच चूक वाटत नाही?" प्राचार्यांनी भुवया उंचावल्या. "हे बघ, अशा संवेदनशील मुद्यावर असे वादग्रस्त लेख छापून येणे बरे नाही. आता

झाले ते झाले, असे लेख पुढे येता कामा नयेत.'' त्यांनी त्यांच्याबाजूने चर्चा संपवली. आजवर मीही माझी धार्मिक, राजकीय मते जगजाहीर मिरवत नव्हतो. कधी गरजच वाटली नाही. त्या विद्यार्थिनीला मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे. ते तरी मान्य करू या, असेही सांगून बघितले, पण उपयोग नव्हता. त्यापुरता मुद्दा संपला. प्राचार्य आलेल्या फोनमध्ये गढून गेले.

मी स्टाफरूममध्ये आलो. माझे एक सहकारी प्राध्यापक कोचावर बसले होते. ते माझ्याकडे येत म्हणाले, ''अरे अभिजित, आपल्या वार्षिकांकातला तो लेख आहे ना, तो तू नीट वाचला नव्हतास का?'' प्राचार्यांनी विचारला तोच प्रश्न. मग डोक्यात प्रकाश पडला. हे महाशय विद्यार्थी परिषदेचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. मी 'विवेक'मध्ये होतो, कवितेवर एक लेखमाला मी तिथे काही काळ लिहिली होती. माझ्या वडिलांशीही त्यांची कधीतरी ओळख झाली होती. यावरून त्यांनी मलाही संघवाला मानले होते. वार्षिकांक छापून आल्यानंतर तीन महिन्यांनी अचानक बोलावून प्राचार्य मला यांचाच प्रश्न विचारतायत; तेव्हा वरील तक्रार त्यांनीच केली होती, हे स्पष्टच होते.

मी त्यांना शांतपणे म्हटले, ''पण सर, मला त्या लेखात काही आक्षेपार्ह वाटत नाही.''

''अरे पण, भाषा काय वापरलीय तिने? नेत्यांच्या आदेशाने तुम्ही मेंढरासारखे निघता—ही काय पद्धत झाली?'' त्यांनी दुसरे हत्यार काढून बघितले.

मी म्हटले, ''बरोबरच आहे. काय चूक आहे त्यात?'' मलाही अभिनिवेश चढला होता. मी म्हणालो, ''ठाकरेंच्या नावाने नाही का शिवसैनिक गोळा होत?''

''हो, पण ठाकरे म्हणजे सगळ्या हिंदूंचे नेते नव्हेत.'' त्यांच्या या विधानाची मला गंमत वाटली. मी म्हटले, ''मग सिंघल, तोगडिया, उमा भारती, रामचंद्रदास परमहंस हे तरी कुठे सगळ्या हिंदूंचे नेते ठरतात? लोक त्यांच्या मागे जातातच ना?'' नेमके त्याच काळात परमहंस नामक साधूने, ''माझ्या स्वप्नात येऊन साक्षात प्रभू रामचंद्रांनी मूर्तीची जन्मस्थानी प्राणप्रतिष्ठा कारायला सांगितली आहे,'' असे म्हणून पुन्हा कारसेवकांना आवाहन केले होते आणि वातावरण तापवून वाजपेयी सरकार व देशाला वेठीस धरले होते. माझ्या विधानाला हाही संदर्भ होता.

त्यांना ते बोलणे झोंबले असावे. मीही विषय वाढवला नाही. विषय वाढवण्यात अर्थही नव्हता. ती निखळ चर्चा नव्हती. अशा भांडणांना अंत नसतो. घरातला अनुभव पुरेसा होता. समाजातली 'सेक्युलर स्पेस' दिवसेंदिवस आक्रसत चालली आहे, याचेच ते प्रत्यंतर होते. पण तुम्ही समाजात वावरत असाल, तर तुम्हाला अशा मुद्यांपासून अलिप्तही राहता येत नाही. मला काय त्याचे, निव्वळ अशीही भूमिका घेता येत नाही.

पुढे वर्ष-सहा महिन्यांनी अशीच एक घटना घडली आणि मग मला माझे मौन सोडणे भागच पडले.

महाविद्यालयातल्या प्राध्यापकांसाठी एक बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यात 'Freinds of Tribal Society' नामक एका सामाजिक संस्थेचे दोन कुर्ताधारी कार्यकर्ते आणि दोन अत्यंत उच्चभ्रू वर्गातल्या महिला उपस्थित होत्या. त्यांनी आम्हाला आदिवासी भागात करत असलेल्या कामाची माहिती दिली. तिथल्या दारुण वास्तवाचे चित्र आमच्यासमोर उभे केले आणि प्राध्यापकांनी-विद्यार्थ्यांनी या सामाजिक कार्यात आपला मौलिक वेळ देऊन सहकार्य केले पाहिजे वगैरे सांगितले. बैठक संपली.

दुसऱ्याच दिवशी प्राचार्यांनी याच संदर्भातल्या अन्य एका बैठकीसाठी अमुकतमुक ठिकाणी जायला सांगितले. मी गेलो. आदल्या दिवसावरून अंदाज आलाच होता, पण तिथे गेल्यावर अधिकच स्पष्ट झाले. 'वनवासी कल्याण आश्रम' हे नाव जसे पटकन संघपरिवारातले म्हणून लक्षात येते, तसे 'Freinds of Trible Society' हे नाही; पण बड्या उद्योगपतींकडून वा त्यांच्याकरवी पैसे उभारून काम करणारी ही देखील एक संघप्रणीत संस्थाच होती.

बैठक सुरू झाली. माझ्यासारखे आमच्या कॅम्पसच्या अन्य महाविद्यालयांतून प्राध्यापक आले होते. त्यांनी आपापली ओळख करून दिली. वातावरण बघून दोघा-तिघांनी आपण संघाचे समर्थक असल्याचे आवर्जून सांगितले. बैठकीच्या संयोजकांनीही मग आपण संघाचे कार्यकर्ते असल्याचे स्पष्ट केले.

विविध महाविद्यालयांतून NSS, म्हणजे राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विद्यार्थी विविध प्रकल्प राबवत असतात. विशिष्ट तास त्यांनी प्रत्यक्ष सामाजिक कार्य करावे अशी अपेक्षा असते. त्याचे त्यांना मार्क्सही दिले जातात. तर या NSSच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आदिवासी भागांमध्ये जाऊन काम करावे. प्राध्यापकांनी याबाबत संस्था आणि विद्यार्थी याबाबतीतले मध्यस्थ बनावे असे

पटवून सांगण्यासाठी ही बैठक होती. बैठकीत दोन महाविद्यालयांचे प्राचार्यही हजर होते. तेही बैठकीतल्या मुद्यांना निमूट रुकार देत होते. आता जणू सगळे होणारच. बस्स! ठरलेच आता, असे चित्र तयार झाले. मी हात वर केला आणि म्हटले, ''पण विद्यार्थ्यांनी काय काम करणे अपेक्षित आहे?''

बोलणाऱ्या वक्त्यांनी स्मित केले. म्हणाले, ''हमने आज तक क्या किया वह बताता हूं. हमारे वनवासी बांधव पाडो में रहते है उनके लिये हम एक विद्यालय चलाते है. उनको इकट्ठा कर एकात्म बनाने, एक सूत्र में उन्हे बांधने, रामप्रतिमा का पूजन आदी कार्यक्रम हम करते है. ख्रिश्चन मिशनरीओंने हमारे गरीब वनवासीओंको धर्मांतरित किया है. उन्हे फिर से मुख्य धारा में लाते है. राम का तो वनवासींओसे बडा गहरा संबंध रह चुका है. तो रामप्रतिमापूजन की माध्यम से...'' त्यावर मी म्हटले, ''महोदय, मुझे क्षमा करे, किंतु इस तरह के सामाजिक कार्य के लिये मुझे कोई भी विचारधारा साथ ले जाने की जरुरत महसूस नही होती. यह कार्य केवल प्रश्नों के आधार पर चल सकता है. गरीबी है, शोषण है, शिक्षा है... कई प्रश्न है. विचारधारा को लेकर कार्य करेंगे तो मुझे आपमें और मिशनरीओ में कोई अंतर दिखाई नही पडता. आप जो कह रहे हैं, उससे मुझे विशिष्ट विचारधारा की बू आ रही है. क्षमा करें, किंतु मैं ये काम नही कर सकूंगा.''

त्या बैठकीत असे काही मी बोलेन असे मलाही वाटले नव्हते. माझ्या बोलण्याने माझ्या सोबतचे सहकारीही चपापले. उच्चभ्रू उद्योगपती बाईने एकदम मला, ''विचारधारा पर आपको कुछ शंका हो तो जरुर हम बातचित करेंगे, किंतु...'' असे समजावून सांगण्याचा पवित्रा घेतला. परंतु मुख्य वक्त्यांनी तिला हातांनी दुरूनच खुणावले. त्यांना माझ्यात वेळ घालवायचा नव्हता. बैठक पुढेही चालली आणि संपली.

महाविद्यालयात परतल्यावर मी प्राचार्यांना स्पष्टपणेच, ''माझे वैचारिक मतभेद असल्याने मी हे काम करू शकणार नाही,'' असे सांगितले. आधीच्या पार्श्वभूमीवर त्यांनीही ते काम माझ्याऐवजी अन्य कुणाकडे सोपवले. बैठका होत राहिल्या, पण आजतागायत काही काम मात्र झाले नाही. माझे मात्र हे धाडस मला भोवू शकले असते. माझ्या नोकरीवर थेट नाही तरी अप्रत्यक्षपणे बेतू शकले असते. पण त्या क्षणी मला भूमिका घेणे टाळताच येईना. NSSच्या

मुलांना जिथे आम्ही राष्ट्रीय एकात्मतेचे धडे देतो, त्या मुलांना अशा विचारसरणीच्या दाव्याला जुंपणार? मला पटेना. माझ्या एकाच्या बोलण्याने हे थांबणार नाही, ही माझी मर्यादाही मला चांगलीच ठाऊक होती. उलट मलाच प्रश्न निर्माण होऊ शकले असते. 'मी हे करणार नाही' एवढेच मला ठाऊक होते आणि मी ते वेळ आल्यावर पहिल्यांदाच इतक्या स्पष्टपणे सर्वांसमोर सांगत होतो.

माझ्यातले बदल आता पुरते स्पष्ट झाले होते.

आणखी एकदा तशी वेळ आली.

सप्टेंबर २००३. बाबरी मशीद पाडण्याच्या प्रकरणात तत्कालीन केंद्रीय मंत्री लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी आणि उमा भारती यांच्यावर हे आरोप ठेवले जाऊ शकतात किंवा नाही, याबाबत रायबरेली कोर्टाचा निकाल दोन दिवसांनी लागणार असल्याची बातमी मी ऐकली. लोकांना भडकवणारे हे नेते कोर्टाच्या तडाख्यातून आताही सुटणार का? मी ह्याच तंद्रीत लेख लिहिला— 'आज अगर खामोश रहे तो कल सन्नाटा छायेगा...' यात मी फक्त जे ६ डिसेंबरला घडले, प्रत्यक्ष पाहिले, त्याबद्दलच लिहिले. पण मशीद पाडली गेली ती मात्र अत्यंत पद्धतशीरपणे, प्लॅन करून, असा माझा त्या वातावरणावरून समज झाला असल्याचे ठाशीवपणे त्या लेखात सांगितले. विशेषत: उमा भारतींनी ज्या चिथावणीखोर घोषणा दिल्या, त्याचाही पुरावा मानता येण्याजोगा होता. प्रत्यक्ष कोर्टात कुणी साक्षी दिल्या, कुणी दिल्या नाहीत हे मला माहीत असण्याचे कारण नव्हते. कोर्टासमोर जाऊन साक्ष द्यायला मी तसा कुणाला माहितही नव्हतो. मी जे पाहिले ते कितपत ग्राह्य धरले जाईल, याबद्दलही शंका होतीच. पण मला राहावेना. मी तो लेख लिहिला आणि थेट कुमार केतकरांना फोन लावला. त्यांनी मला दुपारी 'लोकसत्ता'त बोलावले. "लेख बघतोच, मला आधी तुझे अनुभव सांग." केतकर म्हणाले आणि तासभर माझे बोलणे ऐकत राहिले, मला प्रश्न विचारीत राहिले. दुसऱ्या दिवशी, १८ सप्टेंबर २००३ रोजी, तो लेख लोकसत्ताच्या संपादकियाशेजारी छापूनही आला.

लेखाने निकाल बदलणार नव्हताच. निकालानुसार अडवाणी सुटले, उमा भारती आणि मुरली मनोहर जोशी यांच्यावर या संदर्भात रीतसर खटले भरले

जाण्याचा मार्ग तेवढा खुला झाला. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे मला स्वतःला खूप मोकळे वाटू लागले. हे ओझे मी किती दिवस वागवतोय. सांगून का टाकत नाहीय कुणाला? आणि शेवटी लेखाने ते केले.

❑

६ डिसेंबर १९९२. बाबरी मशिदीचे पतन होऊन एक तप उलटून गेले. मग मी हे सगळे आता, एवढ्या उशिरा का सांगतोय? मुळात का सांगतोय? आताही, एवढे तपशिलात हे 'रामायण' लिहिल्यावर हा प्रश्न मला विचारला जाईलच. एक म्हणजे एका ऐतिहासिक अपराधभावाने मला जे ग्रासलेय, मी बाबरी मशीद पाडणाऱ्यांतला एक कारसेवक होतो—याबद्दलचा अपराधभाव, तो इतरांना सांगणे ही माझीच स्वतःची एक गरज होती, म्हणून. आणि दुसरे, पुन्हा असा कारसेवक निर्माण होऊ नये म्हणून.

हे आत्ताच का? मशीद पाडली गेली तेव्हा या सगळ्या घटनांना पचवत, रिचवत, पारखत त्याविषयी आपले काही मत बनवावे या वयाचा मी नव्हतोच. काहीतरी चुकतेय हे कळत होते. अनेक प्रश्न होते. अनेक निरुत्तरे होती. स्वतःशी द्वंद्व होते. आजूबाजूच्या आपल्याच माणसांशी झगडा होता. माणसांशी नाही, त्यांच्या विचारसरणीशी. या सगळ्यांतून जाऊन माझे मला माझ्यापुरते स्पष्ट होऊन ते मांडणे, ही एक दीर्घच प्रक्रिया होती. पुरेशा धाडसाचाही अभाव होता. आपण एका समाजावर प्रभाव गाजवणाऱ्या विचारसरणीच्या विरोधात बोलतो आहोत, तर जपून.. असाही त्यात भाग होता. मग बोलायला लागलो, ते इतके सगळे!

❑

अलीकडेच अविनाश साळापुरीकरने एक अप्रतिम कविता लिहिलीय. ही कविता खरे तर मीच लिहायला हवी होती, इतकी ती मला माझीच वाटते. माझ्यातलेच काही बोलतेय असे वाटते. आपल्या बायकोला उद्देशून लिहिलेल्या एका कवितामालिकेतली अविनाशची ती कविता अशी :

प्रिय अनु,
उद्या कदाचित
आपल्याला मूल होईल
आणि परवा नाहीतर तेरवाला ते

विचारणारच झालं
तेव्हा तू
काय सांगशील त्याला
मंदिराच्या राजकारणाबाबत
अयोध्या, गोध्रा आणि
गुजरातबाबत
तमाम घटनांचे केस विंचरत ते
थेट आपल्या लोकशाहीच्या टकलापर्यंत जाऊन पोहोचेल
तेव्हा आपणाला
पहिल्यासारखंच गप्प कसे राहता येईल?
प्रिय अनु,
मुलं जेवढी निष्पाप असतात
त्यांचे प्रश्न तेवढेच टोकदार असतात
गुदमरलेल्या श्वासांच्या वतीने तो
जेव्हा टोकदारपणे आपल्यासमोर येऊन
उभा ठाकेल,
तुला वाटतं का
तेव्हा आपणाला काही बोलता येईल?
आपल्या पापांचा निभाव लागेल म्हणून?

मी ज्यासाठी एक दीर्घ लेख खर्च करतोय ते अविनाशने एका कवितेतून साधले. माझ्यातल्या सामाजिक अपराधभावाची टोचणीच या कवितेतून व्यक्त झाली आहे.

मला मुलगा झाला, त्याच दिवशी ठरून गेले की त्याचे नाव 'कबीर' असणार. एक तर त्याला मी कुठलाही धर्म शिकवणार नाही किंवा प्रमुख तीन-चार धर्मांची शिकवण देणार. पण केवळ विचारांनी माणूस घडत नाही. तसे वातावरण लागते. कुठले वातावरण देणार मी कबीरला? कुठले जग मी त्याच्या पुढ्यात ठेवणार? वातावरणात वाढत जाणाऱ्या असह्य हिंसेचे काय करेल तो?

अजून पुरता एक वर्षाचाही झाला नाही कबीर. तरी... खूप साचवून ठेवलेय त्याच्यासाठीही. ते त्याला सांगायलाच हवे.

## ढाई अक्षर प्रेम का...

प्रिय कबीर,

तू अजून खूप लहान आहेस. मी सांगतोय ते समजून घेण्याच्या दृष्टीने. कदाचित अजून १०-१२ वर्षांनीच मी हे तुझ्याशी बोलायला हवे. पण आत्ता, या क्षणी मला जे वाटतेय, ते तुला सांगायलाच पाहिजे. माझी ती गरज आहे म्हणून. नंतरही हेच सगळे सांगता येईलही, पण आत्ताची उत्कटता, तीव्रता नंतरच्या सांगण्यात राहीलच असे नाही. तू, मी, जग खूपच बदललेले असेल तोवर. आणि मला फक्त विचारांचा सांगाडा तुझ्यापर्यंत पोचवायचा नाहीय हे जग भावनेनेही समजून घेता येईल का तुला?

तू जगात आलास त्याच दिवशी एक संघर्ष मी तुला दिला. तो म्हणजे तुझे नाव—कबीर! फक्त तुझी आई याबाबतीत मला समजावून घेऊ शकली. घरातल्यांनी, नातेवाईकांनी नाराजी व्यक्त केली; संमती देताना मौन बाळगले, किंवा काहीच मत न देणे पसंत केले; पण आनंदाने हे नाव कुणीच स्वीकारले नाही. तू तर छोटाच होतास. तुला पर्यायच नव्हता. उद्या तू रांगण्याच्या वयातून चालण्याच्या वयात येशील, मौनाची सोडून माणसांची भाषा बोलायला लागशील, तेव्हा तुझे मित्र किंवा तुला भेटणारे कुणीही विचारेल, कबीर? असे कसे तुझे नाव? (काहींना कबीर बेदी आठवेल.) काही जण म्हणतील, (मला म्हणालेही!) हे तर मुस्लिम नाव आहे. कबीर, दोहा म्हण बघू — कुणी तुझी थट्टाही करतील. आपले नाव काहीतरी वेगळे आहे, एवढेच तुला कळेल. की तुला रडू येईल, असे कसे आपले नाव म्हणून? — उत्तरासाठी एक गोड स्मित मी राखून ठेवलेय. तेच तूही जगाला द्यायचे उत्तर आहे. अजून थोडा मोठा होशील, तेव्हा तुला संत कबीराविषयी सांगीन. त्याहून थोडा मोठा हो, तुला 'कबीर' वाचायला देईन. मग कधीतरी सांगीन, मी का हट्ट केला तुझे नाव कबीर ठेवण्यासाठी ते! ज्या भोवतालच्या आक्रमक धर्मांध प्रवृत्तींनी मी अस्वस्थ झालोय, त्याला 'कबीर' या नावापेक्षा दुसरे कुठले सुंदर उत्तर होते बाळा माझ्याकडे? प्रेम, मानवता, समन्वय म्हणजे कबीर!

नाही, मी तुला माझ्या विचारांचे साधन बनवणार नाही. माझ्या लढ्याचे शस्त्रही नाहीस तू. मी तुला फक्त एक छान मोकळे वातावरण द्यायचे ठरवलेय. बोट धरण्याची तुला आवश्यकता वाटेल, तोवरच जगाचा मी लावलेला अर्थ

तुला सांगीन. सांगत राहीन. तोच तुझाही असला पाहिजे असा आग्रह नाही. नंतर तू स्वतःचा विचार करू लागशील, तेव्हा अगदी मलाही दोष द्यायला मोकळा असशील. फक्त एक कर, एकांगी राहू नकोस. पदोपदी खूप सापळे आहेत आपल्याला अडकवणारे. कुठलीही रेडिमेड विचारसरणी आपल्याला सापळ्यात न अडकण्यासाठी किंवा अडकलो तर त्यातून सुटण्यासाठी उपयोगी ठरत नाही. (विचारसरणीसुद्धा एक सापळाच असते.) उपयोगी पडते ते भान. सतर्क राहणे. माणूस म्हणून जागे राहणे, संवेदनशील असणे.

बाळा, जग आता खूप जवळ आलेय, असे लोक म्हणतात. Global Village अन् काय काय. तुला वाटेल, आपण जन्मतःच विश्वात्मक झालोय की काय? हे ते ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असलेले 'विश्वचि माझे घर' नाही. जागतिकीकरणाच्या नावाने तुला तुझ्या भूमीपासून—संस्कृतीपासून उखडून टाकणारी गोष्ट आहे ती. विविधतेला संपुष्टात आणणारी; तुला माणूस नाही, केवळ एक ग्राहक बनवणारी विस्तारवादी वृत्ती आहे ती. तुझी पिढी याही पिंजऱ्यात अडकण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसऱ्या बाजूला राष्ट्रवादाचे फसवे अर्थ सांगितले जातात. मूलतत्त्ववादी लोकांनी त्याला 'हिंदुत्ववादा'पुरते मर्यादित केलेय. अमुक मूळची परदेशी व्यक्ती पंतप्रधान व्हायला नको म्हणून विरोध करणारे लोकही स्वतःला 'राष्ट्रवादी' म्हणवतायत. प्रत्यक्षात घाणेरडे राजकारण करत, पण स्वतःला गांधी-नेहरूंच्या विचारांचा वारसा लाभलाय असे सांगणारेही आपले राष्ट्रीयत्वच खरे, असा दावा करतायत. धर्मनिरपेक्षतेच्या नावानेही अप्रत्यक्ष धर्माचे राजकारण करणारे लोक स्वतःची राष्ट्रीयता मिरवतायत. तुला लक्षात आले का बाळा, राष्ट्रवादाला राजकारणाने किती संकुचित करून टाकलेय? आणि हो, तरुणांचा 'क्रिकेटीय राष्ट्रवाद' आहे तो वेगळाच. प्रत्येक माणूस स्वतःला एक स्वतंत्र राष्ट्र घोषित करू लागण्याचा धोका तुझ्याच काळात जास्त आहे कबीर. सावध राहा.

विचारसरणींचा अंत झालाय, याचा अर्थ ध्येयपूर्ण चळवळी संपुष्टात आल्यायत असा होतो. उपभोगिता, संधिसाधूपणा, आक्रमकता, हिंसकता... हे सगळे काळाचे गुणधर्म बनलेयत.

तू कुठल्या जगाला सामोरे जाणार आहेस, ते आधी समजून घे. विविधता असणे म्हणजे भेदभाव असणे नव्हे. सगळ्यांनाच जगता आले पाहिजे हे तत्त्वतः खूप सुंदर आहे कबीर. ते व्यवहारतः सुंदर कसे करता येईल? हा

माझा प्रश्न आहे. नाही तर असे करू का, तुला माझ्या प्रश्नांची गोष्टच सांगू का?

एक होता कारसेवक....

कळावे,

पुढील पिढ्यांचा एक अपराधी.

ता.क.: गोष्ट इथेच संपू देत का कबीर?

❑❑❑

Acc. No. 124287
Date 31.3.08

I. I. A. S. LIBRARY

Acc. No.

This book was issued from the library on the date last stamped. It is due back within one month of its date of issue, if not recalled earlier.

CP&SHPS—519-I.I.A.S./2004-25-6-2004-20000.

शालेय-महाविद्यालयीन जीवनात उजव्या विचारसरणीच्या कडव्या प्रभावाखाली असलेला एक युवक वाचनाकडे वळतो; वाचनातून चिंतन सुरू होते. आणि त्यातून व्यक्तिमत्त्वात बाणवली जाते, सहानुभूती आणि करुणाभाव! आपल्या मनात आजवर ठासून भरलेल्या विद्वेषाकडे पाहून हा युवक भयचकित होतो आणि त्या विचारसरणीपासूनच दुरावतो. पुरोगामी, मानवतावादी विचाराकडे त्याचा प्रवास सुरू होतो. हा प्रवास असतो अडथळ्यांनी आणि संघर्षाने भरलेला; पण त्याचवेळी जीवनावरच्या श्रद्धेने भारावलेला. अंतर्बाह्य संघर्षरत राहून जाणीवपूर्वक केलेला हा व्यक्तिमत्त्वाचा कायापालट असतो. या 'कायापालटा'ची मग एक 'कथा' बनते— एक होता कारसेवक

Library IIAS, Shimla
MR 891.468 D 459 E
00124287